# ।। ज्योतिर्मय ।।

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २ रा ❑ मंगळवार दि.२८ जानेवारी २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


विशेष लेख...

## अभिजात मराठी भाषा- अपेक्षा

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल



ज्योतिर्मय 📖 साहित्य
(मागील अंकावरून)

मराठी भाषा ही इतकी प्राचीन भाषा आहे, जी संतांची भाषा होती, छत्रपती शिवाजी महाराजांची भाषा होती, ही भाषा पराक्रमाची, सर्वोत्तम साहित्याची भाषा आहे , अशा भाषेला अभिजात भाषेचा दर्जा उशीरा का मिळाला? त्याचे उत्तर राजकारणात दडले आहे..असो.. आपल्याला इथे राजकारणाबद्दल बोलायचे नाही.

अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यावर काय नक्की गोष्टी घडतील... काय अपेक्षा राहतील..हा खरा प्रश्न आहे.मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याने मराठी भाषेची प्रतिष्ठा आणि सन्मान वाढेल.तसेच मराठी भाषेच्या विकासासाठी अनेक फायदे होतील. मराठीच्या बोलींचा अभ्यास, संशोधन, साहित्यसंग्रह करायला अधिक चालना मिळेल. भारतातील सर्व ४५० विद्यापीठांमध्ये मराठी शिकवण्याची सोय होईल.

प्राचीन ग्रंथ अनुवादित करण्याला प्रोत्साहन मिळेल. महाराष्ट्रातील सर्व १२,००० ग्रंथालये सशक्त होतील. मराठीच्या उत्कर्षासाठी काम करणाऱ्या संस्था, व्यक्ती, विद्यार्थी अशा साऱ्यांना भरीव मदत येईल. प्रत्येक विद्यापीठात अभिजात भाषेसाठी एक अध्यासन केंद्र स्थापन होईल. अभिजात भाषेसाठी सेंटर ऑफ एक्सलंन्स फॉर स्टडिज स्थापन करण्यात येईल. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला विजातच्या कचाट्यातून ही भाषा आता मुक्त झाली. प्रश्न हा आहे की मराठी भाषेच्या विकासासाठी जो निधी लागणार आहे तो केंद्र शासनाने आता लवकरात लवकर राज्य सरकारकडे सुपुर्द करावा. केंद्र सरकारने आता मराठी भाषेच्या विकासासाठी व मराठी भाषेच्या समृद्धतेसाठी अनुदान उपलब्ध करून द्यायला पाहिजे.मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर केंद्र शासनाकडून भरीव असा निधी भाषा प्रकल्पासाठी मिळेल, अशी अपेक्षा आहे. भाषेच्या संवर्धन, विकास आणि वाटचालीत महत्त्वाचे व पायाभूत ठरतील असे संस्थात्मक पातळीवरचे भाषाविषयक काम सुरू करता येणे शक्य आहे. भाषेच्या अंतरंगांचा व क्षमतांचा शोध घेणारे विद्यार्थी, अभ्यासक निर्माण होतील अशा वातावरणाची गरज आवश्यक आहे.

भाषा-बोलीभाषा, प्राचीन साहित्य हस्तलिखितांचे संशोधन व प्रकाशनाचे काम हाती घेतले जाईल. भाषा क्षेत्रात निष्ठेने काम करणार्या व्यक्तींना राष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात येणार आहे. विद्यापीठांमध्ये अभिजात भाषेची अध्यासन केंद्रे कार्यान्वित होतील. यामध्ये दुर्मीळ हस्तलिखिते, ग्रंथ जतन-संवर्धन क्षेत्र, भाषांतरविद्या, प्रकाशन व्यवसाय व डिजिटल मीडिया या क्षेत्रांत रोजगार कौशल्यसेवेच्या संधी निर्माण होणार आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, मराठी ज्ञानभाषा होण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या दृष्टीने मराठीच्या क्षमतांचा विकास व कार्यप्रणाली विकसित होईल, अशी साधने निर्माण करणे गरजेचे आहे. मराठी भाषेच्या स्वतंत्र विद्यापीठाची निर्मिती करण्यात आली आहे. मात्र, त्यासंदर्भातील धोरणात्मक व अंमलबजावणीत्मक चित्र फारसे दिसत नाही. भाषासाहित्याच्या संकलन, संशोधन विकासासाठी विद्यापीठांचा व मराठी विभागांचा सहभाग महत्त्वाचा ठरणार आहे. मात्र, यामध्ये एक उणीव अशी आहे की, महाराष्ट्रातील विद्यापीठांतील मराठी विभागांतील प्राध्यापकपदाच्या जागा वर्षानुवर्षे रिक्त आहेत. याकडे शासनाचे फारसे लक्ष नाही आणि हे चित्र फार केविलजनक आहे.त्याची पुरता आता करावी लागणार आहे..

भाषा केवळ अभिजात ठरवल्याने अमर होत नाही, मराठी भाषेला सगळ्यांना मिळून जगवावे लागणार आहे. प्राथमिक शिक्षणापासून तर पदवीपर्यंत मराठीची सक्ती असली तरच मराठी जगणार आहे. म्हणजे शिक्षणाचे माध्यम मराठी हवे. इंग्रजी भाषा उच्च शिक्षणासाठी शिकण्यास परवानगी, ठीक आहे, परंतु आपली विचार करण्याची भाषा मराठीच असायला हवी आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळा नसल्या तरच हे साध्य होणार आहे. अर्थात मराठी भाषेतून शिकूनही नोकर्या, व्यवसाय उपलब्ध होऊ लागले तरच ते शक्य आहे. त्यासाठी मराठी ही बोली, व्यवहारभाषेसह वाणिज्य, शास्त्र, तंत्रज्ञान, विज्ञान अशी सर्वांगीण ज्ञानभाषा होण्यास हवी. महाराष्ट्रात आपापसात संवादाची भाषा ही मराठीच असली पाहिजे, ती बहुतांश हिंदी होऊन गेली आहे. स्वत: मराठी माणूस परप्रांतीयांसोबत हिंदी बोलण्यास सुरुवात करतो. मराठी माणूस कोणत्याही हॉटेलात, चहाच्या टपरीवर, बाजारात अनोळखी माणसांशी हिंदी बोलू लागतो. त्यामुळे समोरच्या परभाषिक माणसांना संवादासाठी या राज्यात मराठी शिकून घ्यावी असे वाटत नाही. दरम्यान, महाराष्ट्रात हिंदी भाषा इयत्ता पहिलीपासून सक्तीची करण्यात आली. एकीकडे मराठी भाषा अभिजात होते तर दुसरीकडे राज्यात हे भाषिक- शैक्षणिक धोरण मराठीच्या मुसक्या आवळीत आहे. खेड्यापाड्यातही दुकानांच्या पाट्या अन्य भाषांत लावल्या जातात. केवळ सत्ताकारणासाठी राजकारण करणार्या राज्यकर्त्यांकडून याची अंमलबजावणी शक्य नसल्याने सामाजिकतेसाठी संस्थाकारण करणार्या नेत्यांची महाराष्ट्राला गरज आहे!

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला पण दुसरीकडे चौदा हजारांच्या आसपास मराठी शाळा मागील दहा वर्षांत बंद पडल्या आहेत. पैकी काही विकण्यासही सुरुवात झाली आहे. ज्या मराठी शाळा अस्तित्वात आहेत तेथे जिल्हा परिषदांकडून कंत्राटी पद्धतीने (१ सप्टेंबर २०२४ पासून) शिक्षकभरती होत आहे. कंत्राटीचा हा निर्णय महाराष्ट्र सरकारचा आहे व फार बाधक आहे.

महाराष्ट्राच्या राजधानीत- मुंबईत तर मराठीची भीषण अवस्था आहे. 'मराठी माणसाला प्रवेश नाही' अथवा 'मराठी तरुणांनी नोकरीसाठी अर्ज करू नये' अशा सूचना महाराष्ट्रातच नोकर्यांच्या जाहिरातींत जाहीरपणे प्रसिद्ध होऊ लागल्या आहेत. विशिष्ट सामाजिक भागात राजकारणी लोक ठरवून हिंदीत भाषणे करू लागले आहेत. महाराष्ट्रातील घरांच्या काही सोसायट्यांमध्ये मराठी माणसाला नाकारले जाते. महाराष्ट्रातील रेल्वे स्थानकांत मराठीऐवजी गुजराती भाषा लिहिली जाते. ही सर्व कशाची लक्षणे आहेत? मराठी भाषा अभिजात झाली, म्हणून ती मरू शकत नाही असे मुळीच नाही. उदाहरणार्थ, संस्कृत ही मृत भाषा असली तरी तिलाही अभिजात भाषेचा दर्जा देण्यात आला आहे, हेही मराठी माणसाने लक्षात ठेवावे.

# विश्व मराठी साहित्य संमेलन दुजाभाव का?

ज्योतिर्मय 📖 साहित्य

राज्य सरकारच्या मराठी भाषा विभागातर्फे पुण्यात ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी या कालावधीत विश्व मराठी संमेलन होत आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर होणारे हे पहिलेच विश्व मराठी संमेलन आहे. यापूर्वीची दोन संमेलने अनुक्रमे मुंबई आणि नवी मुंबई येथे झाली होती. पुणे येथील काव्यसंमेलन, मराठीला अभिजात दर्जाविषयी परिसंवाद, बालसाहित्य, लोकसाहित्याविषयी चर्चा असे कार्यक्रम यात होणार असून, परदेशस्थ मराठीजनांना याचे आमंत्रण देण्यात आले आहे.

जागतिक स्तरावर मराठीचा प्रचार प्रसार व्हावा, विश्वस्तरावर मराठी ची व्याप्ती वाढावी हा त्यामागचा उद्देश आहे. वाढदिवसाच्या विदेशातील मराठी साहित्यिकांना या संमेलनात निमंत्रण देण्यात आले आहे.संमेलनाला येणाऱ्या परदेशस्थ मराठी व्यक्तींना प्रवास खर्चापोटी प्रत्येकी ७५ हजार रुपये अनुदान देण्यात येणार असल्याची चर्चा साहित्य वर्तुळात आहे. 'विश्व मराठी संमेलनांसाठी येणाऱ्यांना कोणाचीही मागणी नसतानाही सरकार प्रत्येकी ७५ हजार रुपये देणार आहे. एकीकडे परदेशस्थ मराठीजनांवर सरकार लाखो रुपये खर्च करत आहे तर दुसरीकडे देशस्त मराठी जणांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करत आहे. विशेष म्हणजे

दिल्लीत होणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला जाणाऱ्यांसाठी रेल्वे तिकिटातही सूट देण्यात आलेली नाही.एकीकडे विदेशी पाहुण्यांवर लाखो रुपये खर्च करण्याची तयारी सरकारची आहे तर दुसरीकडे देशातील मराठी साहित्यिकांवर खर्च करायला सरकार तयार नाही. सरकारकडून असा दुजाभाव




प्रा डॉ सुधीर अग्रवाल
वर्धा

का केला जात आहे, असा सवाल उपस्थित होत आहे. सरकारचे अनुदान परदेशी मराठी लोकांनी स्वीकारू नये, असे आवाहन कॅलिफोर्नियामधील मराठी भाषक अभय पाटील यांनी केले. भारताच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या मराठी साहित्यिकांना दिल्लीतील जुने महाराष्ट्र भवन मिळावे यासाठी आटापिटा करावा लागत आहे. सरकारला विनंती करावी लागत आहे. सरकार याबाबत फारशी गंभीर नसल्याचे दिसून येत आहे. दिल्लीत प्रस्तावित अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी देशभरातून येणारे मराठी सारस्वत व साहित्यप्रेमींच्या निवासाकरिता जुने महाराष्ट्र सदन मिळावे, असे विनंतीपत्र आयोजक संस्थेने राज्य शासनाला चार महिन्यांआधी पाठवले होते. परंतु, याबाबतचा निर्णय लालफितीत अडकला असून सदन सशुल्क द्यायचे की, नि:शुल्क यावरच अद्याप खल सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

दिल्ली येथे २१, २२ आणि २३ फेब्रुवारी रोजी साहित्य संमेलन होत आहे. या संमेलनाच्या कार्यालयीन कामांसाठी १ नोव्हेंबर ते २५ फेब्रुवारीपर्यंत मंत्र्यांकरिता आरक्षित असलेले जुन्या महाराष्ट्र सदनातील एक कक्ष देण्यात यावे व सोबतच संमेलन काळात देशभरातून येणारे मराठी सारस्वत व साहित्यप्रेमींच्या निवासाकरिता सदनातील सर्व खोल्या मिळाव्या यासाठी सरहद या आयोजक संस्थेने तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना विनंतीपत्र दिले होते. त्यांनी या पत्राची तत्काळ दखल घेत योग्य कार्यवाहीसाठी संबंधित विभागाला निर्देश दिले होते. परंतु, पुढे आचारसंहिता लागली आणि निवडणूक होऊन मुख्यमंत्री बदलले. तेव्हापासून हा विषय प्रलंबितच आहे. संमेलनासाठी सदन सशुल्क द्यायचे की, नि:शुल्क यावरच मुख्यमंत्री कार्यालयात खल सुरू असल्याने अनेक दिवस पर्यंत यावर निर्णय झाला नव्हता..यावर टीका टिप्पणी व्हायला लागताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जुने महाराष्ट्र भवन देण्याचे मान्य केले आहे.

# मराठी भाषा अभिजात होती, आहे आणि राहिलच!–संमेलनाध्यक्ष डॉ.तारा भवाळकर

**शतकाकडे वाटचाल करणा–या या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला महिला अध्यक्षपदाचा सन्मान केवळ पाच लेखिकांनाच मिळाला. कुसुमावती देशपांडे (ग्वाल्हेर) दुर्गा भागवत (कराड), शांताबाई शेळके (आळंदी) डॉ.विजया राजाध्यक्ष(इंदूर) डॉ.अरुणा ढेरे(वर्धा)आणि डॉ.ताराबाई भवाळकर(नवी दिल्ली) नवी दिल्ली येथे ७२ वर्षापूर्वी ५४ वे साहित्य संमेलन झाले होते,तेव्हा महाराष्ट्र राज्याची निर्मितीही झाली नव्हती,आणि अ.भा.मराठी साहित्य महामंडळही अस्तित्वात नव्हते.या ५४ व्या साहित्य संमेलनाचे उद्घाटन पंतप्रधान पंडीत नेहरु यांनी केले होते; अध्यक्ष होते तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी,आणि स्वागताध्यक्ष होते,काकासाहेब गाडगीळ.आता तीच पुनरावृत्ति यंदाही होत आहे.९८ व्या संमेलनासाठी उद्घाटक म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी लाभले आहेत,अध्यक्षपदाचा बहुमान डॉ.ताराबाई भवाळकर यांना मिळाला आहे.तर स्वागताध्यक्ष म्हणून शरद पवार आहेत.**

ज्योतिर्मय 📖 साहित्य
(मागील अंकावरून)




**लोकसाहित्याचे संशोधन, संशोधक म्हणून आपण केलेलं कार्य, पुस्तकाचं लेखन आणि संशोधनाचं काम ,या प्रवासा मध्ये तुम्ही आज पण सक्रीय आहात, हा प्रवास आजपर्यंतचा कसा होता? ही वाटचाल पुढे कशी प्रवाहित होत गेली..**

काय झालयं, लोकांनी माझ्यावरती लोकसाहित्याचा एक ठप्पा मारुन ठेवलेला आहे. वस्तुतः माझ्या अभ्यासाचे विषय हे विविध प्रकारचे आहेत. ज्याच्याकडे अभ्यासकसुद्धा अलिकडच्या काळामध्ये दुर्लक्ष करत आहेत. माझी सुरुवात जी झालेली आहे ती नाटकापासून झालेली आहे आणि नाटकामध्ये नाटयसंशोधन, नाट्यसमीक्षा, नाटकामध्ये अभिनय करणं, त्या अभिनया मध्ये राज्य पातळीवर पुरस्कार मिळवणं, संस्था चालवणं, संस्थेमधून विद्यार्थी ,विद्यार्थिनी तयार करणं हे सगळं मी सांगली मध्येच केलेलं आहे आणि सांगलीमध्ये आमची ॲमेच्युअर्स ड्रॅमॅटिक असोशिएशन नावाची संस्था... ही मी ५० वर्षापूर्वी स्थापन केलेली आणि त्याच्या मधले कलाकार आजही मोठ्या प्रमाणावर कार्यरत आहेत.

आपल्या लेखनाची सुरुवात ही नाटकापासूनच झाली?आणि त्यासाठी बरीच भटकंतीही आपण केलीत,या विषयी जाणूण घ्यायचे आहे.

होय लेखनाची सुरुवात माझी नाटकापासून झालेली आहे. माझं संशोधन नाटकामध्ये आहे. माझं पहिलं पुस्तक नाटकामधलं प्रकाशित झालेलं आहे, माझा प्रबंध जो आहे तो मी पुणे विद्यापीठामध्ये नाटकावरचा आहे. त्याला विद्यापीठाचा सर्वोत्कृष्ट प्रबंधाचा पुरस्कार मिळालेला आहे. त्यामुळे नाटक हा माझ्या अभिरुचीचा मुलभूत विषय आहे आणि विष्णुदासांच्या या नगरीत आल्यानंतर विष्णुदासांनी नाटक केलं म्हणजे नक्की काय केलं याचा शोध घेता घेता असे लक्षात आलं की, विष्णुदासांनी कर्नाटकी नाटक पाहिलं आणि त्याच्या अनुकरणातून ते केलं. मग ते कर्नाटकी नाटक कुठलं होतं तर ते एकप्रकारचं त्या काळातलं लोक नाटय होतं... रामकथेवरचं आणि मग त्याच्यावर निरनिराळे वाद झालेले आहेत. कोकणातले लोक म्हणायला लागलेत की, अशा प्रकारची नाटकं आमच्याकडे आधी होती, गोव्यातले लोक म्हणाले आमच्याकडे आधी होती मग हे प्रत्येक ठिकाणचाचं काय आहे हे पाहण्यासाठी मी संशोधनासाठी फिरले. मी नाटय संशोधनासाठी फिरले. आणि ही लोकनाटय किंवा लोकरंगभूमी ज्याला म्हणता येईल ती रंगभूमी ती कन्नड मधील दक्षिणेकडची सगळी तंजावरपर्यंत, तंजावरला भोसले राजांची नाटके, आपले शिवाजी महाराजांच्या कुळामधले राजे होते त्यांनी नाटकं लिहिलेली ही अन्य कन्नड नाटकं आहेत, गोव्यामधली नाटकं, कोकणामधली दशावतार खेळ अशा अनेक प्रकारच्या नाटकांचा प्रत्यक्ष तेथे जाऊन अभ्यास केलेला आहे, ज्याला क्षेत्रीय कार्य म्हणतात असा आणि त्यामुळे तो माझा जो अभ्यास विषय आहे ज्याला आपण अंतर्ज्ञानशाखीय अभ्यास पध्दती, विविध विषयांचा स्पर्श असलेली अभ्यासपध्दती.. म्हणून केवळ नाटक, केवळ साहित्य, केवळ कविता, केवळ कथा असं नाहीये, त्याच्यात समाजशास्त्र आहे, मानववंशशास्त्र आहे, मानसशास्त्र आहे. संगीत आहे. गीत आहे. नृत्य आहे. पुराणकथा आहे, समाज आहे, तिथला इतिहास आहे, भूगोल आहे अशा अनेक शास्त्रांचा धांडोळा घेत घेत मी लोक संस्कृतीचा अभ्यास केला. हा नेहमीच करावा लागलो कारण त्याच्याशिवाय तो परिपुर्ण होत नाही कारण आपल्या सगळयांचं जगणं या अनेक विषयांशी संबंधित असतं. केवळ एकरेषीय असं जगणं नसेत आपले कुणाचंही. म्हणून संस्कृती एकाने कोणीतरी निर्माण केली आणि मग ती बाकीच्यांनी उचलली असं होत नाही.

**यातून संस्कृती कशी घडते?**

मानव समूह जसजसा जगत असतो तसतसं त्याच्या जगण्यातनं तो ज्या निसर्गाच्या वातावरणात वाढत असतो, ज्या परिसरात वाढत असतो त्याच्यातनं संस्कृती घडत जात असते आणि संस्कृती घडते महणजे नेमकं काय घडतं? तर तिथल्या चाली-रीती-रुटी आचार धर्म-देवदेवता-त्याचा आचारधर्म त्याचा अगदी अन्न वस्त्र निवारा हे सगळं आपल्या भोवतालचं जग आपल्याला घडवत असतं. आपला भूगोल


विशेष मुलाखत
**प्रशांत गौतम**
**दिपाली यादव-फाळके**

आपल्याला घडवत असतो. आपण काय खायचे हे आपण नाही ठरवू शकत, ते फक्त आता हॉटेलमध्ये ठरवु शकतो. नैसर्गिकरित्या नाही आपण ठरवू शकत. नैसर्गिकरित्या आपण ज्या भूप्रदेशात राहतो, या प्रदेशात ने अन्न धान्य निर्माण होतं, तेच आपण खात असतो. तिथे जी वस्त्र मानवतील तीच वस्त्र जापण घालु शकत असतो. त्यामुळे हा संस्कृतीचा अभ्यास हा अनेक विषयांना स्पर्श करणारा इंटरडीलीप्लीनरी स्टडी ॲप्रोच अशाप्रकारचा असतो आणि त्यापध्दतीनं मी तो करत आलेली आहे. त्यामुळे त्याच्यामध्ये लोकसंस्कृतीचा अभ्यास करताना लोककलांचाही मी अभ्यास केला. केवळ लोकनाट्याचाच नसेल मग तो लोकनृत्य आलं, त्याच्यामधली वाद्य आली. माणसं आली, त्यांची शैली आली, विविधप्रकारच्या त्यांच्या



भाषा आल्या, त्यांचं जगणं नातं अशा अनेक गोष्टींचा अभ्यास करत जाते. तिसरी गोष्ट म्हणजे माझं आणखीन लेखन ते स्त्रीयांच्या अंगांनी आहे. त्याचं कारण असं, कदाचित स्त्री असल्यामुळे माझं पहिलं लक्ष जात ते कुठल्याही संस्कृतीमध्ये त्या स्त्रींयांच स्थान काय आहे. मग ती लोकसंस्कृती असू दे, अभिजन संस्कृती असू दे. नाटक असू दे किंवा आणखीन कुठली कला असू दे तिथल्या स्त्रीचं जगणं आणि तिचं स्थान काय आहे. पोथ्या पुराणांनी तिला उदात्त म्हेंटल म्हणून ती प्रत्यक्षामध्ये तशी आहे का? तर त्यामुळे आपल्याला असं दिसतं की, याच्यामध्ये प्रचंड विसंगती आहे की एकीकडे आपण मातेला महन, मंगल, पवित्र उदात्त वगैरे, वगैरे, वगैरे.... काय जी असेल ती विशेषणे घालत असतो आणि माणसे पहिली शिवी घालतात ती आईवरण, याच्यामध्ये काही विसंगती आहे आणि या संस्कृतीमध्ये आम्ही आमच्या आईचा अपमान करतो आहोत असं आम्हाला वाटतं का? तथाकथित शिक्षक म्हणवणाऱ्या लोकांच्यासुध्दा या गोष्टी लक्षात येत नाहीत आणि सहज कोणीही घरातल्या कुठल्याही स्त्रीची अवहेलना करतात. मोठी माणसं जसं वागतात त्या घरातल्या बायकांशी तसं मग ते लहान मुलंही वागतात. जर बाप आईला म्हणत असेल, **(क्रमशः)**

## लक्षवेधी छायाचित्र....



हे अंबर निळे, ही प्रतिबिंबात जळे...

(छाया – मनोहर मंडवाले, कल्याण)

## सेलूत स्मृतिगंधचे अनोख्या पद्धतीने प्रकाशन

ज्योतिर्मय 📖 साहित्य

**सेलू** – सेलू येथील नूतन विद्यालय शिक्षण संस्था ही उपक्रमशील संस्था आहे. नूतनचे वातावरण सकारात्मक आहे. नूतन महाविद्यालय केवळ सिमेंटच्या भिंतीवर उभे नाही. तर श्रध्दा, चारित्र्य, नैतिकता, गुणवत्ता हा संस्थेचा भक्कम पाया आहे.

नूतन महाविद्यालयाच्या माजी कर्मचाऱ्यांच्या आठवणींचा समावेश असलेला स्मृतिगंध हा ग्रंथ पुढील पिढीला चांगले काम करण्याची प्रेरणा देणारा आणि आठवणींचे संचित असलेला ग्रंथ आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.सोमनाथ रोडे ( लातूर ) यांनी केले.

नूतन महाविद्यालयाचे संस्थापक प्राचार्य द.रा.कुलकर्णी यांच्या ९२ व्या वाढदिवसाचे औचित्यासाधून त्यांच्यात संकल्पनेतून साकारलेल्या स्मृतिगंध पुस्तकाचे प्रकाशन प्राचार्य डॉ.रोडे यांच्या हस्ते बुधवारी (२२ जानेवारी) रोजी अनोख्या पद्धतीने झाले. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ.एस.एम.लोया होते. या प्रसंगी प्राचार्य द.रा.कुलकर्णी, सचिव प्राचार्य डॉ.विनायकराव कोठेकर, माजी ग्रंथपाल अरविंद जोशी, डॉ. प्रभाकर देव, डी.के.देशपांडे, प्राचार्य डॉ.शरद कुलकर्णी, गौतम सूर्यवंशी, प्राचार्य डॉ.उत्तम राठोड, डॉ.राजाराम झोडगे, प्रा.हेमचंद्र हडसनकर, प्रा.मोहन पाटील, डॉ.गंगाधर गळगे, उपप्राचार्य डॉ.महेंद्र शिंदे यांची उपस्थिती होती.







– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com

आनंदी पहाट...


## सुखद आठवणी म्हणजे आनंदानुभूती

ज्योतिर्मय साहित्य

''आठवणी म्हणजे आनंदाचे कंद'', हे एकीकडे आपण अनुभवत असतो, पण त्या आठवणींत आपण स्वत: किती व्यस्त व्हायचे, ह्याचे भान राखणे देखील महत्वाचे ठरते. जोपर्यंत काही घडत आहे, तो पर्यंत सर्व ठीक आहे; पण जेव्हा काही बिघडेल तेव्हा मात्र निस्तरणे मुश्कील ठरू शकते. ह्याची जाणीव आपल्याला होणे अधिक महत्वाचे आहे. कित्येकदा, ह्या आठवणीच आपल्या मनाला उभारी देत असतात. आपला मानसिक एकलेपणा दूर करण्याच्या कामी येतात. आपण शरीराने एका वेळेला एकाच ठिकाणी जाऊ शकतो, पण गत काळातल्या आठवणी मात्र आपल्याला अनेक ठिकाणांची सफर करवून आणतात. आठवणी ह्या मुंग्यांच्या वारुळाप्रमाणे असतात. आठवणींचेही तसेच आहे. साठवणीतल्या अशा अनेक आठवणी आपल्या मनांत घर करून रहात असतात. आठवणीतला एखादा क्षण जरी आपल्याला आठवला तरी तो संपूर्ण दिवस विलक्षण करत जातो. ह्या आठवणीच आपापल्या परस्परांतील नात्याची वीण घट्ट करत जातात.

आपण वर्तमानांत आपले जीवन जगत असताना खरे तर सद्य:स्थितीचा आणि नजीकच्या भविष्यकाळाचा विचार करणे महत्वाचे, गरजेचे आणि म्हणूनच आवश्यक असते. आपण वर्तमानातील जीवन जगताना प्राप्त परिस्थितीचा आनंद लुटण्याच्या ऐवजी भूतकाळाचे गोडवे गात बसतो. मागील काळात, गत आयुष्यात, भूतकाळात मी कधी, कसा, कोण, कोठे आणि काय होतो, ह्यापेक्षा सद्य:स्थितीत, वर्तमानकाळात, आज मी कसा, कोण, कोठे आणि काय आहे? आणि ते सुद्धा का? ह्याचा प्रकर्षाने आणि प्राधान्याने, सातत्याने आणि साकल्याने अभ्यासपूर्वक विचार करत राहणे गरजेचे असते. मी कालच्या पेक्षाही आज सरस, प्रगत होणे आवश्यक आणि म्हणूनच महत्वाचे असते.

## समर्थांच्या घरी...




ज्योतिर्मय साहित्य
(मागील अंकावरून)

समर्थ नेहमी बाहेर हिंडत असायचे आणि घरात त्यांचा वावर कमी म्हणून एकदा आई त्यांना म्हणाली की नारायणा, अरे तुझा भाऊ गंगाधर तुझ्यापेक्षा फक्त तीन वर्षांनी मोठा आहे तरी तो कुळकर्णीपणाचे काम पाहतो. तू थोडा तरी घराकडे पहात जा, प्रपंचाची चिंता कर. हे ऐकल्यानंतर नारायण स्वतःच्या मनाशी विचार करू लागला आणि तिथेच असलेल्या एका अळगळीच्या खोलीत जाऊन चिंतन करीत बसला. कित्येक तास गेले तरी तो कोणाला दिसला नाही. त्यांची आई जेव्हा काही कामानिमित्त त्या खोलीत केली तेव्हा आईने त्यांना विचारले की नारायणा, इथे काय करतो आहेस रे ? तेव्हा ते उतरले,'' आई चिंता करितो विश्वाची.'' आईने सांगितले होते प्रपंचाची चिंता करायला आणि लहानग्या नारायणाला पडली होती विश्वाची चिंता. ही चिंता त्याने आयुष्यभरच केली आणि जगाच्या कल्याणासाठीच आपले आयुष्य वेचले. '' आई चिंता करितो विश्वाची,'' हे त्यांचे बोल अजूनही या परिसरात घुमत आहेत की काय असे वाटते.


पुढे समर्थांचे मोठे बंधू असलेले गंगाधरपंत यांना त्यांच्या वडिलांनी म्हणजे सूर्याजीपंतांनी अनुग्रह दिला. त्यांनी आपल्यालाही अनुग्रह द्यावा म्हणून समर्थ खूप मागे लागले. परंतु तू अजून लहान आहेस. इतक्यात गडबड करू नकोस असे वडिलांनी सांगितले. त्यामुळे समर्थ रुसून बसले आणि गावाबाहेरच असलेल्या मारुतीच्या मंदिरात जाऊन मारुतीरायाची मनधरणी करू लागले. संध्याकाळ झाली, रात्र झाली तरी तेथून ते हलले नाहीत. शेवटी तिथेच त्यांना अति श्रमामुळे झोप आली. त्यावेळी प्रत्यक्ष मारुतीरायांनी दर्शन देऊन त्यांची समजूत घातली आणि त्यांना कृपाशीर्वाद दिला. हे मारुतीचे मंदिर आजही आपल्याला जांब गावात बघायला मिळते. समर्थ ज्या ठिकाणी रुसून बसले होते आणि ज्या ठिकाणी त्यांना मारुतीरायाने दर्शन दिले ते मंदिर पाहता आल्यामुळे मला जो आनंद झाला तो शब्दातीत आहे. म्हणूनच इथली माती हे पवित्र माती आहे. कुसुमाग्रज यांच्या शब्दात थोडा बदल करून असे म्हणता येईल की

जांब गावीच्या मातीचा
लावा ललाटास टिळा
हिच्या संगतीने घडल्या
बाल समर्थांच्या लीला.

याच गावामध्ये समर्थांचे देवघर आहे म्हणजे समर्थांचे वडील ज्या मूर्तींची पूजा करीत असत त्या मूर्ती आजही आपल्याला बघायला मिळतात त्यामध्ये राम, सीता आणि लक्ष्मण यांच्या मूर्ती आहेत. तसेच समर्थांच्या वडिलांना प्रत्यक्ष सूर्यनारायणाने भेट दिलेली पंचायतन मूर्ती देखील या ठिकाणी पाहायला मिळते. अतिशय सुंदर असलेल्या या मूर्ती पाहून मन प्रसन्न होते. साधारणपणे सीतामाता रामाच्या डाव्या बाजूला उभी असते परंतु या ठिकाणी मात्र ती उजव्या बाजूला आहे. इथे ती आदीमायेच्या रूपात आहे म्हणून तिचे स्थान उजव्या बाजूला आहे असे म्हटले जाते. याच ठिकाणी समर्थकालीन वाड्याचे काही पुरातन अवशेष आपल्याला आढळतात.

येथूनच साधारणपणे तीन किलोमीटर असलेल्या आसनगाव या गावी समर्थ रामदासांचे लग्न लागले होते. त्यावेळी समर्थ केवळ बारा वर्षांचे होते परंतु लग्न लागण्यापूर्वीच सावधान शब्द कानी पडल्यानंतर ते सावधान झाले आणि त्यांनी तेथून पळ काढला. संसारातील व्यर्थपणा त्यांना कळला. आणि पुढे समाजाला सावधान करण्यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य खर्च केले त्यांनी समाजाचा संसार केला. अशा या आसन गावी ज्या बोहल्यावर समर्थांचे लग्न लागले होते तो बोहला आजही बघायला मिळतो.

समर्थांच्या वास्तव्याने पावन झालेली अशी अनेक ठिकाणी या परिसरात आहेत. ती पाहण्याचे भाग्य लाभल्यामुळे मला खरोखरच धन्यता वाटली. समर्थांच्या कार्याविषयी ज्यांना आदर आहे, ज्यांची समर्थांप्रती श्रद्धा आहे, अशा सर्व समर्थ भक्तांनी एकदा तरी या परिसराला अवश्य भेट द्यावी इतके हे ठिकाण सुंदर आणि पावन आहे.




## दासबोध स्तवन

उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

ज्योतिर्मय साहित्य

जयजय रघूवीर समर्थ

थोरापेक्षा थोर व ईश्वराचा ईश्वर असणाऱ्या शारदेस करून माझ्या अल्पबुध्दिच्या अभ्यासाने मायेच्या ममतेने सद्गुरू स्तवन करण्याचा प्रयत्न करत आहे. हे ईश्वरा माझ्या लेखणीत सद्गुरू चे सामर्थ्य दे.

सद्गुरू स्वरूप अनाकलनीय आहे स्थलकालाच्या मर्यादेत वावरणाऱ्या विश्वाला परमात्मा आतबाहेर व्यापून आहे व्यक्ती व विश्व यांना व्यापून तो शिल्लकच ऊरतो असे कल्पनातीत अनंत परमात्मास्वरूप म्हणजे संतांचा सद्गुरू होय. माणूस जन्माला आल्यापासून व कळायला लागते तेव्हापासून या अफाट विश्वातील सुर्यनारायणाशी आपला पहिला संबंध येतो तो आपल्याला दर्शन देतो. सुर्य, समुद्र, आकाश, प्रुथ्वी,चंद्र चांदण्या, ग्रहतारे मानवी बुद्धी सारासार कवळण्याची धडपड करत ती धडपड कमी पडते आणि ही कमी पणाची भावना लपवण्यासाठी आपण म्हणतो

''परमात्म्याचे वर्णन अवर्णनीय आहे''

परंतु दासबोधातील पहिल्या दशकातील चौथ्या समासाचा अभ्यास केला तर समर्थ म्हणतात ''सुर्याच्या प्रकाशाने अंधार पळून जातो त्याच प्रमाणे सद्गुरूचा अभरहस्त ज्याच्या मस्तकी असतो त्याच्यावर सद्गुरूची कृपा होते. सद्गुरू स्वामीराज शिष्याच्या अज्ञानाला मुळासकट ऊपटून टाकतो त्यामुळे जीवाची जन्ममरणाच्या चक्रातून सुटका होते. सद्गुरू त्याच्या शिष्याला सोने व सरिता याची ऊपमा देतात. कारण सोने खराब होऊन त्याचे लोखंड कधीच होत नाही तद्वतच सद्गुरूच्या दासाचे मन ईतके शुध्द असते की यात संशयाला कधीच थारा नसतो. अनेक लहान लहान ओढे नदीला मिळतात आणि त्याची गंगानदी बनते तशीच सद्गुरूला मिळवण्यासाठी शिष्य हा सुरवातीला सामान्य माणूस म्हणून जगतो सद्गुरूच्या परिसस्पर्शाने तो अधिकार पदाला प्राप्त होतो. परिस व तिचा ऊणेपणा शिष्याला गुरूपद प्राप्त होते सोने आपल्या स्पर्शाने लोखंडाला सोने बनवू शकत नाही म्हणून परिसाची ऊपमा लागू पडत नाही. ''सागर व त्याचा ऊणेपणा'' सागराचे पाणी खारट असते म्हणून सद्गुरू सागरा सारखा असतो ही कल्पना ऊणी पडते.


''मेरूपर्वत व त्याचा ऊणेपणा'' पर्वत ऊंच व अनेक चढ ऊतारांनी घाट माथ्यानी बनलेला असतो. मेरूपर्वत अचेतन आहे दगड कठोर आहे पण आपला सद्गुरू कठोर नाही त्याचे अंतःकरण कोमल आहे तो दीनदयाळ, दीनांचानाथ आहे तोप्रचंड मायाळु आहे भक्तांच्या हाकेला तो लगेचच धाऊन येणारा आह तो सचेतन आहे. ''गगन व त्याचा ऊणेपणा'' सद्गुरू शुन्यापलीकडील स्वरूप आहे. ''प्रुथ्वी व तिचा ऊणेपणा'' कल्पातांच्या वेळी प्रुथ्वी विरून जाईल पण सद्गुरू अभंग राहील म्हणून ही ऊपमा ऊणी पडते. ''सुर्य व शेष यांचा ऊणेपणा'' शास्त्रामध्ये सूर्यप्रकाशाच्या मर्यादा सांगितलेल्या आहेत प्रुथ्वी वर काही भागात सहामहिने दिवस व सहा महिने रात्र असते हे आपण अभ्यासले आहेच सद्गुरुच्या ज्ञान प्रकाशाला कोठेच मर्यादा नाहीत तो अनादी अनंत आहे. शेषाची ऊपमा द्यावी तर तो डोक्यावर ओझं वहातो म्हणून ही ऊपमा ऊणी पडते. ''पाण्याचा ऊणेपणा'' पाणी चंचल आहे जेव्हा खुप पाऊस पडतो तेव्हाही ओलादुष्काळ शिष्याला सहन करावा लागतो व अजिबात पाऊस पडत नाही तेव्हा देखील शिष्य पाण्यासाठी तडफडतो म्हणून ही ऊपमा योग्य नाही.

''अमृत व त्याचा ऊणेपणा स्वर्गात राहून देवनित्य अमृत पितात पण अखेर देवालाही काही मर्यादा आहेत पण सद्गुरूची कृपा असेल तर तो खरा अमर बनतो म्हणून ही ऊपमा ऊणी पडते.

''कल्पतरू व चिंतामणीची ऊपमा''

कल्पना ओलांडूनच सद्गुरू जवळ जावे ज्याच्या मनात चिंता आहेत ज्यांना चिंतामणीचे महत्व आहे ज्याला काही ईच्छाच तो कामधेनुचीही धार काढणार नाही म्हणून ही ऊपमा ऊणी पडते.

इति श्री दासबोधे गुरूशिष्य संवादे अती गोड हा
जय जय रघूवीर समर्थ
श्री राम जर राम जय जय राम (क्रमश:)



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## नामाचे प्रेम येण्यासाठी खरी कळकळ पाहिजे

ज्योतिर्मय साहित्य

नामाचे प्रेम का येत नाही, हा प्रश्न बहुतेकजण विचारतात. पण थोडासा विचार केला तर असे लक्षात येईल की, हा प्रश्नच बरोबर नाही. मूल न झालेल्या बाईने, मुलाचे प्रेम कसे येईल ? असे विचारण्यासारखाच हा प्रश्न आहे. मूल झाले की प्रेम त्याच्याबरोबरच येत असते. तेव्हा मुलाचे प्रेम कसे येईल हा प्रश्न करण्याऐवजी मूल कसे होईल याचाच विचार करणे बरोबर ठरेल. आपणसुद्धा प्रश्न करायचाच असेल तर नामाचे प्रेम कसे येईल असा करण्याऐवजी, मुखी नाम कसे येईल असा प्रश्न करणे बरोबर होईल. मुखी नाम यायला वास्तविक आडकाठी कोणाची आहे ? दुसर्या कोणाचीही नसून आपली स्वत:चीच आहे. वास्तविक, एकदा नाम घ्यायचे ठरवून सुरूवात केली की झाले. पण तसे होत नसेल तर, दोष दुसर्या कोणाचा नसून आपला स्वत:चाच आहे. म्हणून नाम घेणे हे आपले काम आहे; मग त्याच्या पाठोपाठ येणे हा प्रेमाचा धर्मच आहे. जसे आईच्या बाबतीत, मूल आणि प्रेमाचा पान्हा ही निराळी असूच शकत नाहीत, तसे नाम आणि त्याचे प्रेम ही एकमेकांना सोडून राहूच शकत नाहीत. ह्यावरून एक गोष्ट अशी ठरली की, प्रेम का येत नाही, याचे उत्तर आमच्याजवळच आहे, आणि ते म्हणजे, नाम घेत नाही म्हणून. यावर कोणी असे म्हणेल की, आम्ही नाम घेतोच आहोत, तरीही प्रेम का येत नाही ? हे विचारणे ठीक. पण आता आम्ही जे नाम घेतो म्हणून म्हणतो, त्याचा विचार केला तर काय दिसेल ? पोटी जन्माला आलेल्या मुलाबद्दल जसा कळवळा असतो, तसा नामाबद्दल आपल्या ठिकाणी कळवळा नसतो. सर्व संतांनी किंवा आपल्या गुरूने, नाम घ्यावे असे सांगितल्यामुळे आपण ते घेतो, किंवा दुसरे काही करायला नाही म्हणून घेतो, इतकेच. अर्थात, तसे घेतले तरी आज ना उद्या आपले काम होईलच. पण प्रेम का येत नाही, असा प्रश्न विचारण्यापूर्वी, आपण नाम किती आस्थेने घेतो, हा प्रश्न स्वत:ला विचारणे जरूर आहे. एखाद्या बाईला फार दिवसांनी मूल झाले तर त्याच्याबाबतीत तिची जी स्थिती होते ती नामाच्या बाबतीत आपली होणे जरूर आहे.

आपल्या देहाची वाढ जशी आपल्याला नकळत होते, तशी आपली पारमार्थिक उन्नतीही आपल्याला नकळत झाली पाहिजे. ती कळली तर सर्व फुकट जाण्याचा संभव असतो. परमार्थात मिळविण्यापेक्षा मिळविलेले टिकविणे, हेच जास्त कठीण आहे. ज्याला मी काही तरी झालो असे वाटते तो काहीच झालेला नसतो. अशा माणसाने फारच सांभाळले पाहिजे.

नवर्याला देव आवडत नाही म्हणून बायकोने नामस्मरण सोडण्याचे कारण नाही. तिने नाम घेतले तर धर्म सोडला असे न होता उलट संसार सुखाचा होईल

संस्कृती व संस्कार



विभावरी कुलकर्णी,
मो. ८०८७८१०१९७

## व्रतोपासना – मानवता

ज्योतिर्मय साहित्य

आपण बऱ्याच गोष्टी नकळत करत असतो. त्यात काही चुकीच्या गोष्टी पण आपल्या हातून नकळत घडतात. त्याच जर हेतुपुरस्सर बदलल्या तर ती सवय होऊन जाते. आणि भावी पिढी साठी ते संस्कार बनून जातात. यातील काही आवश्यक गोष्टी विविध कारणांनी मागे पडत चालल्या आहेत. यातील एक गोष्ट म्हणजे अन्नाचा सन्मान

आपल्याही नकळत आपण बरेचदा अन्नाचा अपमान करत असतो. कदाचित ते लक्षात पण येत नाही. इथे मला एक गोष्ट आठवते. एक खूप मोठे कुटुंब असते.घरातील सगळे काम करणारे असतात. रात्री ते एकत्र जेवत असतात. एक दिवस घरात फक्त तांदूळ असतात. त्या घरातील मोठी सून त्या तांदुळाची खिचडी करायला ठेवते. तितक्यात तिची सासू येते. तिला वाटते सून मीठ घालायचे विसरली म्हणून ती त्यात मीठ घालते. असेच घरातील तिन्ही सुनांना वाटून प्रत्येक जण स्वतंत्र पणे मीठ घालून जाते. त्याच वेळी लक्ष्मी व अवदसा या घरात असतात. आणि या घरात कोणी राहायचे या वरून त्यांच्यात वाद होतो. आणि असे ठरते, या कुटुंबातील एकाही व्यक्तीने अन्नाला नावे ठेवली नाही तर त्या घरात लक्ष्मी निवास करेल. आणि कोणी नावे ठेवली तर अवदसा त्या घरात राहील. त्या दोघी घरात एका बाजूला बसून निरीक्षण करत असतात. घरातील सर्व पुरुष मंडळी प्रथम जेवायला बसतात. सासरे पहिला घास घेतात त्याच वेळी भात खारट झाल्याचे लक्षात येते. पण घरातील स्त्रियांचे कष्ट लक्षात घेऊन ते काहीही न बोलता गुपचूप जेवतात. ते बघून त्यांची मुलेही गुपचूप जेवतात. त्यामुळे छोटी मुले, स्त्रिया कोणीही काहीही न बोलता जेवतात. थोडक्यात अन्नाला कोणीही नावे ठेवत नाहीत. म्हणजेच *अन्नाचा सन्मान* ठेवतात. आणि लक्ष्मी कायमची त्या घरात निवास करते.

अन्नाचा सन्मान हे खूप मोठे व महत्वाचे व्रत आहे. त्या सन्मान करण्यात शेतकरी त्यांचे कष्ट,घरातील स्त्रिया त्यांची कामे या सगळ्यांचा सन्मान असतो. परंतू हल्ली वाया जाणारे अन्न पाहिले की मनाला त्रास होतो. एकीकडे आपण *अन्न हे पूर्णब्रह्म* म्हणतो. त्यावर आपला देह पोसला जातो. जेवणाला उदर कर्म न मानता यज्ञ कर्म मानतो. मग अन्न टाकून देताना ही भावना का विसरतो? असा प्रश्न पडतो. एखाद्या कार्यात बघितले तर अन्नाची नासाडी दिसते. आणि त्याच रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला अन्नासाठी व्याकूळ झालेले लोक दिसतात. आणि अन्न वाया जाणार नाही,या साठी पण कायदे करण्याची आवश्यकता आहे का? असा प्रश्न पडतो.

पुण्यातील एका कार्यालयात मी असा अनुभव घेतला आहे. ताटात कोणी अन्न ठेवून ताट ठेवायला गेले की तेथे उभी आलेली व्यक्ती ते ताट ठेवू देत नाही. ताट रिकामे करून आणा म्हणून ती व्यक्ती सांगते. सावकाश संपवा अशी विनंती केली जाते. सुरुवातीला लोकांना हे आवडले नाही. पण त्या कार्यालयाचा तो नियमच आहे. एकदा समजल्यावर लोक मर्यादेत वाढून घेऊ लागले. एका डायनिंग हॉल मध्ये पण अशी पाटी लावली आहे. ताटातील अन्न संपवल्यास २० रुपये सवलत मिळेल. असे सगळीकडे व्हावे असे वाटते. त्याही पेक्षा आपण ठरवले तर अन्नाचा योग्य सन्मान करु शकतो. आणि आपले बघून पुढची पिढी हेच संस्कार स्वीकारणार आहे.

अन्नाचा सन्मान तर पूर्वी पासूनच आहे. पण पुन्हा त्याला नव्याने उजाळा देण्याची वेळ आली आहे. तर *अन्नाचा सन्मान* हे व्रत आचरणात आणण्यास कोणाची हरकत नसावी.



## नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**प्रस्तावना :** भारतीय वाङ्मयाच्या इतिहासात जसे कथा, आख्याने, व्याकरण ग्रंथ, उच्चारणशास्त्र ग्रंथ, तत्त्वज्ञानपरक ग्रंथ यांचे स्थान आहे, त्याच प्रमाणे नीतीशास्त्राच्या ग्रंथांचे देखील महत्वपूर्ण असे स्थान आहे. नीतीशास्त्रीय वाङ्मयात विशेषत: माणसाने चांगले जीवन जगण्याकरीता ''काय करावे आणि काय करू नये'' या विषयी प्रतिपादन केलेले असते. प्राचीन भारतीय साहित्यात भर्तृहरिविरचित-नीतिशतकम्, कामंदकीय नीतिसार, कौटिल्याचे अर्थशास्त्र इत्यादी ग्रंथांचा समावेश होतो.

भर्तृहरि हे एक यशस्वी राजे होते. त्यांच्या कालखंडाविषयी विद्वानांमध्ये एकमत नाही. काही विद्वान त्यांचा काळ इसवी सन ७८ सांगतात. तर काही विद्वान त्यांचा कालखंड इसवी सन ५४४ सांगतात.

त्यांनी नीतिशतकम, वैराग्यशतकम्, शृंगारशतकम् अशी शतक काव्ये तसेच वाक्यपदीयम् हा शास्त्रीय ग्रन्थ यांची रचना केली आहे.

नीतिशतकम् या ग्रंथात त्यांनी १०० पेक्षा अधिक श्लोकांमधून सज्जनांची लक्षणे, मुर्खांची लक्षणे, विद्वानांची लक्षणे, कर्माचे महत्व, सत्कर्माचे महत्व, सुसंगतीचे महत्व इत्यादी विषयांवर उद्बोधक विचार मांडले आहेत. शिक्षक, विचारवंत, अभ्यासक, प्रवचनकार, कीर्तनकार आणि पालक अशा सर्वांसाठीच उपयुक्त असे हे श्लोक आहेत. यातील निवडक श्लोक, त्यांचे अर्थ आणि ह.भ.प. डॉ. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर यांचे निरुपण आजपासून वाचकांसाठी खास प्रकाशित करण्यात येत आहेत.

बोद्धारो मत्सरग्रस्ताः प्रभवः स्मयदूषिता:।
अबोधोपहताश्चान्ये जीर्णमङ्गे सुभाषितम्।।

अर्थ – विद्वान लोकांना मत्सराने पछाडले आहे. प्रभावशाली लोक अहंकाराने दुषित झाले आहेत. आणि उर्वरित लोक अज्ञानाने पीडित आहेत. सुभाषित म्हणजे सुवचन ह्रदयातच जीर्ण झाले आहे.

कविराज भर्तृहरीने या श्लोकात एक खंत बोलून दाखवली आहे. कवी म्हणतो की, विद्वान लोकांना मत्सराने पछाडले आहे. अर्थात विद्वान लोकांनी परस्परांना आणि एकमेकांच्या ठिकाणी असलेल्या ज्ञानाचा तरी सन्मान केला पाहिजे, आदर केला पाहिजे. परंतु असे घडत नाही. विद्वान लोक परस्परांशी स्पर्धेने वागतात. ''तू अधिक शहाणा की, मी अधिक शहाणा?'' अशा प्रकारे त्यांच्यांत स्पर्धा असते. ही स्पर्धा निकोप न राहता पुढे त्याचे पर्यवसान परस्पर मत्सर आणि द्वेष यांमध्ये होते. इकडे विद्वानांची ही त-हा, तर प्रभावशाली लोकांबद्दल काय सांगावे? ते अहंकाराने दुषित झाले आहेत. बरे ज्यांचेकडे ज्ञान नाही, ते अज्ञानाने त्रस्त झाले आहेत. अशा परिस्थितीत सुभाषितं म्हणजे चांगली वचनं ह्रदयातच जीर्ण होत आहेत. अर्थात विद्वज्जन अहंकारामुळे सुभाषितं ऐकण्यास तयार नाहीत. अज्ञानी लोकांनी ऐकून उपयोग नाही. त्यामुळे सुभाषितं सांगण्याची संधी मिळत नाही. म्हणून ती सुभाषितं ह्रदयातच जीर्ण होत आहेत, असे भर्तृहरी महाराज येथे सांगतात.



## आरोग्य संजीवनी

### सैंधव मीठ



ज्योतिर्मय साहित्य

रोजच्या जेवणात साधं मीठ नाही, सैंधव मीठ वापरावे

१. सैंधव मीठामध्ये इलेक्ट्रोलाइटसचे प्रमाण सामान्य मीठापेक्षा कमी असते. यामुळे हाडांचा ठिसूळपणा, सांधूदुखी या समस्या दूर राहण्यास मदत होते. शरीराला प्रमाणापेक्षा जास्त इलेक्ट्रोलाइटस मिळाले तर हाडांचे दुखणे त्रास देऊ शकते. त्यामुळे आहारात सैंधव मीठाचा वापर करावा.


२. ज्यांना उच्च रक्तदाबाचा त्रास आहे अशा व्यक्तींना नियमितपणे सैंधव मीठ खाण्याचा सल्ला दिला जातो. त्यामुळे रक्तदाब नियंत्रणात राहण्यास मदत होते. मीठामुळे रक्तदाबाची समस्या वाढते, मात्र मीठ पूर्ण बंद करणे शक्य नसल्याने आहारात साध्या मीठापेक्षा सैंधव मीठाचा वापर करणे केव्हाही चांगले.


३. गेल्या काही वर्षात हृदयरोग असणाऱ्यांचे प्रमाणही वाढले आहे. हृदयाच्या तक्रारी वाढल्या तर एकाएकी हृदयाचा झटका येऊन जीव गमावण्याची शक्यता असते. पण अशा व्यक्तींनी आहारात सैंधव मीठ खाल्ल्यास त्याची हृदयरोगाची समस्या दूर होण्यास मदत होते.

***

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

# रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

**(मागील अंकावरून)**

रवींद्रनाथांची जडणघडण आणि कार्य ज्या काळात झाले तो काळ म्हणजे साधारणपणे १९ व्या शतकाचा उत्तरार्ध आणि २० व्या शतकाचा पूर्वाध. या काळात इंग्रज सत्ता भारतात स्थिरस्थावर झाली होती. इंग्रजी भाषा, इंग्रजी शिष्टाचार भारतीयांच्या अंगवळणी पडले होते. इंग्रजी शिक्षणातून नवनवीन गोष्टी, तत्वज्ञान, शोध यांचा परिचय भारतीयांना होत होता. इंग्रजी भाषा बोलणे, पाश्चात्य शिष्टाचारांचे पालन करणे यात नवशिक्षित वर्ग विशेषतः शहरी वर्ग धन्यता मानत होता. इंग्रजांना आपलं राज्य चालवण्यासाठी कारकून वर्ग हवा होता. इंग्रजांच्या या जाळ्यात शहरी आणि बुद्धिजीवी वर्गातील बरोबर अडकले. बंगाली भाषेत अशा लोकांना मोशीजीवी म्हटलं जाई. मोशीजीवी म्हणजे शाईजीवी. आपल्या लेखणीवर म्हणजेच कारकुनीवर उपजीविका करणारे. इंग्रजी भाषा उत्तम प्रकारे बोलता, लिहिता, वाचता आली की सर्व सुखांची किल्लीच जणू आपल्या हाती आली असं मानणारा हा वर्ग होता.

असे सगळे वातावरण असले तरी याचा अर्थ असा नव्हता की आपल्या भारतीय भाषा, संस्कृती, प्राचीन भारतीय वाङ्मय या सगळ्या गोष्टी टाकाऊ किंवा कालबाह्य झाल्या होत्या. पण दुर्दैवाने साहेबांच्या भाषेत शिक्षण घेणाऱ्या, त्याचे अनुकरण करणाऱ्या मंडळींना आपल्याच या गोष्टी कालबाह्य वाटू लागल्या होत्या. आपली भाषा समृद्ध असताना आणि सर्वत्र बोलली जात असताना ती बोलण्यात कमीपणा वाटणे, इंग्रजीतच बोलणे, लिहिणे आणि भाषण करणे यात मोठीच प्रतिष्ठा वाटत होती. आपल्याकडे विशिष्ट कारणाने दरवर्षी भरणाऱ्या जत्रा, धार्मिक उत्सव, पूजापाठ, पारायणे आदी गोष्टी म्हणजे थोतांड वाटू लागले होते. अर्थात गोऱ्या साहेबाचा या गोष्टीला हातभार होताच. या सगळ्या पार्श्वभूमीवर रवींद्रनाथांच्या कुटुंबातील वातावरण कसे होते हे जाणून घेणे मोठे मनोरंजक आणि तितकेच बोधप्रद आहे. टागोरांच्या पूर्वजांचे आणि इंग्रजांचे अतिशय उत्तम संबंध होते. इंग्रजी भाषा, इंग्रजी शिष्टाचार या गोष्टींशी त्यांचा अतिशय उत्तम परिचय होता. एवढेच नव्हे तर टागोर अँड कंपनी च्या जहाजातून परदेशात मालाची चढउतार आणि व्यापार होत होता. एवढं सगळं असलं तरी या कुटुंबानं आपलं स्वत्व कधीच सोडलं नाही. ब्रिटिशांच्या सत्तेच्या प्रभावाला भुलून आपली संस्कृती त्यांनी कधीच त्याज्य मानली नाही. इंग्रजी भाषा, विज्ञानातील नवनवीन शोध, इंग्रजी वाङ्मय या गोष्टींशी त्यांचा उत्तम परिचय होता पण या गोष्टींचा स्वीकार करताना आपलं ते त्याज्य किंवा वाईट असा ग्रह या कुटुंबाने कधीच करून घेतला नाही. वेद, उपनिषदे आणि आपल्या संस्कृतीतील चांगल्या गोष्टी आणि परंपरा यांचे पालन त्यांनी केले. त्यात आपल्या रूढीपरंपरांचे आंधळेपणाने पालन करण्याची वृत्ती मात्र नव्हती. नव्यातील चांगले ते स्वीकारणे आणि जुन्यातील कालबाह्य झालेल्या गोष्टींचा त्याग करणे हे करण्यासाठी जो डोळस विवेक लागतो, तो त्यांच्यापाशी उत्तम होता.

## प्रेमाची बहारदार वास्तव कहाणी – लिव्ह इन

ज्योतिर्मय साहित्य





कलाविष्काराची समंजस मैत्री, नाट्य व चित्रकलेचा प्रेमरंग, कालानुरूप बदलते जगण्याचे संदर्भ, नात्यांचे उथळ वागणे, सुटलेल्या वेळेचा तुटलेला संवाद, इगो सांभाळताना दुरावलेले भावविश्व, मेंदूवर व्यसनाचे तयार झालेले वारूळ, प्रेमाच्या जागी उरलेला पश्चाताप या कोलाहलातून दिवाकर आणि मिथिलाच्या प्रेमाची संसार कहाणी लिव्ह इन या कादंबरीतून उत्तमरीत्या चित्रित करण्यात आलेली आहे.

त्यामुळेच हे पुस्तक काळजाचा ठाव घेते.

**परीक्षण :**

आपल्या समाजात तरुण–तरुणीच्या एकत्र राहण्याला आदराने पाहिले जात नाही. परंतु, भारत वगळता इतर अनेक देशामध्ये अशा नात्यांना मान्यता दिली जाते.

**पुस्तक परीक्षण**

आशिष निनगुरकर

खरेतर अशा नात्याला भारतात विशेष म्हणजे समाज त्यांच्याकडे तिरकस नजरेने पाहत असला तरी कायदा त्यांच्या पाठीशी उभा असतो. भारतातील संसदेत या संदर्भात कोणताही कायदा करण्यात आलेला नाही, परंतु सर्वोच्च न्यायालयाने या संदर्भात दिलेला आदेश कायदा म्हणून स्वीकारण्यात आला आहे. सोप्या भाषेत सांगायचे तर, ही एक अशी व्यवस्था आहे ज्यामध्ये विवाहित नसलेले दोन लोक पती–पत्नी म्हणून एकत्र राहू शकतात. पण हे नाते स्नेहाचे आणि दीर्घकाळ टिकणारे असावे. एखाद्यासोबत रात्र घालवणे याला लिव्ह–इन रिलेशनशिप म्हणता येणार नाही. सर्वात मोठी गोष्ट अशी आहे की असे दोन्ही लोक प्रौढ असावेत.

१९९० नंतरचा काळ हा सर्वार्थाने गतिमान काळ. या कालखंडातील विविध बदलाने माणसांचे शांत, संथ जीवन पार विसकटून टाकले. मानवी नाते, स्त्री–पुरुष संबंध, विवाह, समाज इत्यादी अनेक घटकांवर त्याचा मोठा प्रभाव पडला. माध्यमक्रांतीने तर अवघे विश्व एका क्लिकवर येऊन स्थिरावले. संवादाची अनेक माध्यमे वाढली; परंतु माणसे एकमेकांपासून दुरावत गेली. या समकालीन वास्तवाचा परिणाम जसा मानवी मूल्यांवर झाला; तसाच तो कुटुंब, समाज, संस्कृती, धर्म आणि कला व्यवहारावरही झाला. या आभासी काळात नीती अनीतीच्या कल्पना खूपच धूसर झाल्या. वाढता व्यक्तिवाद, चंगळवाद आणि अस्वस्थतेने माणसाचे अवघे भावविश्व व्यापले, तो भांबावून गेला. या काळाच्या सर्वस्तरीय स्पर्धेत काय निवडावे, काय सोडावे ? याचे विवेकी भान त्यास राहिले नाही. त्याचे जीवन नानाविध समस्यांनी घेरले. यातूनच माणसे तूटत गेली. परिणामी त्यांच्या वाट्याला कमालीचे एकाकीपण आले आणि अनेक प्रश्नांचे कोलाहल घेऊन ती जगू लागली. या विसकळीतपणातून दुभंगलेली मने आणि भंगलेले सहजीवन अशा विसंगतीचे चित्र आजूबाजूला दिसू लागले. या समकालीन जीवन वास्तवाचे **(क्रमशः)**

# उंबरा

ज्योतिर्मय साहित्य

सकाळीच शेतीत काम करणाऱ्या दाजीला सावकारच्या दोन माणसांनी वाड्यावर हजर केले होते. ०५ वर्षापूर्वी घेतलेल्या कर्जाची परतफेड होत नव्हती. सावकार झुलत्या खुर्चीवर बसून आज पैसे घेतल्याशिवाय यांना सोडू नका असा आदेश देऊन त्या खुर्चीवर मागे पुढे झुलत होता. परिस्थितीनं पिचलेली ती मानसं सदैव त्या सावकाराची उंबरे झिजवत होती. कर्जाच्या ओझ्याखाली दबलेली अशी अनेक माणसं कर्जाच्या परतफेडी होत नसल्याने गाव सोडून गेली होती आणि त्या जमीनीवर सावकाराचा आपोआपच ताबा होत होता. दाजीची सुध्दा जेमतेम एक–दीड एकर जमीन. तेवढयाच जमीनीवर कुटुंबाचे पालनपोषण होते. सततच्या दुष्काळी परिस्थितीने, घरातील हालाखीच्या परिस्थितीने प्रत्येक वर्षाला थोडे कर्ज घेण्याचीच वेळ येत होती परंतु कर्जातील एक पै सुध्दा परतफेड होत नव्हता. अशीच चार–पाच वर्षे गेल्याने आता परिस्थिती हाताबाहेर गेली होती. अशा परतफेड न करणाऱ्या लोकांसोबत जुलुम करण्यासाठी सावकारानी कांही माणसं पाळली होती. ती पाळलेली माणसं अशा कर्जाऊ लोकांना, त्यांच्या परिवाराला छळत होती व ते सहनशक्तीच्या पलिकडे गेले होते. दाजीने आज एक दिवसाची कशीतरी सुटका करुन घेतली होती. दुसरा दिवस उजाडण्याआधी दाजी आपला छोटासा परिवार घेऊन गाव सोडून पसार झाला होता. पुन्हा तो सावकाराचा उंबरा ओलांडायचा नाही अशी त्याने जणू शपथच घेतली होती.

रोजगाराच्या शोधात त्यांनी एक मोठं शहर गाठलं. पोटाची भुक आणि कामाचा शोध घेता घेता मिळेल तो रोजगार करुन दिवसामागून दिवस काढीत होता. पाहता पाहता १०–१५ वर्षे निघुन गेली. दाजीच्या स्वभावगुणानं एक कुटुंब गावाबाहेर गेलं याचं दु:ख गावकऱ्यांना होतं तेवढीच चीड सावकाराबद्दल होती. सावकारानं अशी अनेक कुटुंब गावातून हद्दपार केली होती. परंतु हळुहळु सावकाराची सुध्दा परिस्थिती ढासळत चालली होती. पापाच्या मार्गाने कमवलेलं जास्त काळ टिकत नाही अशी भोळी समजुत आहे परंतु ती खरी ठरत होती. सावकारानी मोठमोठी कर्ज दिलेली माणसं परतफेडीपासून दूर झाली होती. जास्तीची दमदाटी करण्याचा काळ उरला नव्हता. त्यामुळे सावकाराची पुंजी सुध्दा संपलेली होती. एक एक जमीनीचा तुकडा आता विक्रीची वेळ आली होती आणि शेवटी तो वाडा सुध्दा विक्रीची नामुस्की सावकारावर आली होती.

गावातील कांही लोक शहराकडे गेली त्यावेळी एका व्यापारी पेठेमध्ये दाजी नजरेस पडला. गांवकऱ्यांना हर्ष झाला. भेटीगाठी झाल्या, गावाची विचारपूस झाली आणि सावकाराची सुध्दा विचारपूस झाली. सावकाराच्या त्या परिस्थितीबद्दल दाजीला थोडी दया आली आणि चिडही. दाजीने त्याचा जम बसविला होता. कांही प्रवासी वाहनांचा ठेका त्यांच्याकडे होता. दररोजची चांगली कमाई होती. पैसा कमविला होता, सुधारणा झाली होती. गावांकडे कांही शेती घ्यावी असे अनेक दिवसापासून मनात होते. परंतु सावकाराचा उंबरा न ओलांडण्याची शपथ त्यास आठवली. दाजीचा स्वाभिमान जागा झाला. ज्या उंबऱ्यावरुन आपण गाव सोडले तोच

माधव सूर्यवंशी,
माकणीकर.

उंबरा विकत घ्यायचा. ज्या उंबऱ्यावर गरीबगोरांवर अन्याय व्हायचे त्यावर गरीबगोरांना न्याय दयायचा निश्चय केला आणि तसेच झाले. दाजीने तो सावकाराचा वाडा विकत घेतला. गावाकडे जाऊन वाडयात राहु लागला. व्यापाराची एक लाईन त्यास मिळाली होती व ती भरपूर पैसे देत होती. ज्या उंबऱ्याजवळ बसून सावकाराच्या त्या खुर्चीपुढे झुकुन नमस्कार करुन याचना करावी लागे तो वाडा, ती खुर्ची दाजीची झाली. सावकाराच्याच ढंगामध्ये खुर्ची मागेपुढे करीत सावकाराचा जणु बदल घेतल्याचे सुख तो घेऊ लागला. खिशात पैसा जास्त झाला की तो खर्चण्यासाठी सुध्दा अनेक विचार सुरु होतात तसे दाजीचे झाले. दाजीने छोटी छोटी कर्ज देण्यास सुरुवात केली.

दाजीचा कर्ज देण्याचा व्यवहार वाढला. गरीबगोरांना मदत केली पाहिजे अशी सुरुवातीची दाजीची भावना होती त्याप्रमाणे तो छोटी मोठी गरीबांना मदत करीतही होता. कांही काळ लोटला. गरीबांना दिलेली कर्ज परतफेड होईनाशी झाली. ती कर्ज वसुलीसाठी दाजी प्रयत्न करुन सुध्दा कर्जाची वसुली होत नव्हती. त्यामुळे दाजीने मदतीला दोन लोकं घेतली. सावकाराची खुर्ची थोडयाच काळात दाजीच्या अंगात आली आणि त्या उंबऱ्यावर पुन्हा गरीबांचा छळ सुरु झाला. खुर्चीतील व्यक्ती बदलली होती परंतु सावकार कायम होता.

पाच दहा गरीब लोकांनी कर्जाची परतफेड न केल्याने त्यांच्या शेतीच्या कागदपत्रासह त्या लोकांना त्या वाडयात बोलावण्यात आले होते. दाजी आता तो पुर्वीचा दाजी राहीलेला नव्हता. त्या गरीब लोकांच्या विनवणीचा विचार करण्याची मानसिकता दाजीमध्ये नव्हती. एका पैशाचे किती पैसे झाले आणि ते वसुल केल्यानंतर पुढच्या वाढत्या पैशाचा तो विचार करीत होता. त्यावेळी कांही गावातील पंच मंडळी त्या वाडयावर जमली. दाजीचा बदललेला स्वभाव पाहून सर्वजण आश्चर्यचकीत होते. दोष माणसांचा आहे की खुर्चीचा आहे हेच समजत नव्हते. पंच मंडळीपैकी एक वयस्कर व जाणकार पंच बोलु लागले. ''दाजी, सावकाराला ही खुर्ची त्यांच्या अनेक पिढ्यापासून आलेली होती व परंपरेने ती सावकारकी आली होती. त्यामुळे अनेक वर्षाची सावकारी त्याच्या अंगात भिनली होती ती सुध्दा टिकली नाही. जोरजबरदस्तीने, अन्यायाने कमवलेल्या पैसा टिकत नाही. मागच्या अनेक दशकापासून या उंबऱ्यावर अन्यायच होत आले आहेत, ते दाजीमुळे बदलेल असे वाटले होते. परंतु दाजीच्या अंगात सुध्दा सावकाराची खुर्ची शिरली याचे वाईट वाटते. तर मग सावकार आणि दाजीमध्ये फरक काय?

दाजीला त्याच्या चुकीची जाणीव झाली. पैशाचा मोठा हव्यास ठेवण्यापेक्षा, पैशाच्या वसुलीला गुंड माणसं पाळून त्यांच्यावर खर्च करण्यापेक्षा चार पैशाची गरीबांना सुट देऊन मदतीला येणे यातच माणुसकी आहे हे दाजीला पटले. त्या दिवशी दाजीने बैठकीतील ती खुर्ची हटविली. सर्व गावकऱ्यांसोबत जमीनीवर घोंगडी टाकून साधी बैठक ठेवण्यात दाजीने आनंद मानला. आणि त्याच्या साध्या राहणीमानामुळे गावातील प्रत्येकांना त्या वाडयाचा उंबरा आता हक्काचा वाटु लागला.

# आनंदाचं झाड शाळेतलं, शाळेतच वाळवी लागेलेलं ...

ज्योतिर्मय साहित्य

होय हे अगदी विरोधाभास असला तरी हे खर आहे. एखाद आनंदाचं झाड हे वाळवी लागलेलं असतं. हे झाड जेव्हा पाखरांनी गजबजलेलं असतं. तेव्हा त्या पाखरांच्या मधुर स्वरांनी हे अतिशय समृध्द होत आणि त्यावर पोपटाच्या ढोल्या , घुबडाच्य ढोल्या , असे पक्षी वास्तव्यात असतात.

असेच जुने लिंबाचे झाड होते . त्यावर घुबडाला , पोपटाला राहायला आनंद वाटायचा. दररोज परिपाठ सुरू झाला की घुबड त्याच्या ढोली तून बाहेर यायचं आणि फांदीवर बसून रोज परिपाठ ऐकायचं. ते झाड होत तोपर्यंत हे नित्याच होत. मलाही त्या घुबडाला पाहिल्याशिवाय करमत नव्हतं. असेच एकदा वाळवी लागून त्या झाडाच्या किडीचे प्रमाण वाढले आणि हे घुबडाला आनंद देणारे झाड ऑफिसवर पडेल या भीतीने तोडण्यात आले. ते घुबड दूर कुठेतरी निघून गेले. नंतर मला चुकल्या चुकल्या प्रमाणे होत होते . कारण ती घुबड जोडी मला नंतर पाहायला मिळाली नाही.

आता काही दिवसापूर्वी शाळेतल्या दुसऱ्या लिंबाच्या झाडाला कीड लागलेली आहे ते आतून वाळवी ने पूर्ण पोखरले आहे. याच्या अनेक फांद्या तोडण्यात आलेल्या आहेत. त्यातच माझी आवडती पोपटाच्या ढोली ची फांदिही गेली. मला पोपटाच्या ढोली बद्दल खूप वाईट वाटले. कारण त्याचे मिठू मिठू मी रोज ऐकत होते. मुलांच्या परिपाठबरोबर पोपटांचा झाडावर नियमित परिपाठ सुरू आहेच. या परिपाठ ऐकण्याची सवय झालेली आहेच. पण असे दृश्य दुर्मिळ होतेच. किती सुरेख या पोपटाचा परिवार या झाडावर अनेक वर्षापासून वास्तव करीत आहे. त्या झाडाचा, या शाळेचा, या शाळेतील झाडाचा या पाखरांना किती गोड लळा लागलेला आहे. त्यांची घर असणारी ढोलीची फांदी जरी झाडापासून तोडली तरी ही पाखरे रोज परिपाठ समयी या निष्पर्ण , वाळवी लागलेल्या वृक्षावर येतात. आणि त्याचे मंजुळ बोल नित्य कानावर पडतातच. या वरून हे लक्षात आले की वृक्ष जेव्हा बहारदार होता तेव्हा देखील हे पक्षी जसे आनंदाने या वृक्षावर बागडत होते तसेच हे पक्षी आता हे झाड त्यांचं आनंदाचं झाड खूप खूप वाळवी लागून निष्पर्ण झालेलं आहे तरीही त्या पक्षांचे त्या झाडावरील प्रेम यत्किंचितही कमी झालेले नाही. ही पाखरे दररोज वृक्षाला या शाळेला भेट देण्यास निश्चित कुठेही गेली तरी परिपाठ समयी येतात. आपला परिपाठ ह्या पक्ष्यांच्या मनावर देखील राज्य करतो. हे पक्षी शालेय प्रांगणातील झाडावर किती छान रुळलेत हे कळले. आणि दररोज त्यांना पाहण्याची त्यांचा मधुर परिपाठ ऐकण्याची सवय आम्हालाही लागली. या आनंदाचं झाडावर या पोपटी पाखरांची शाळा रोज भरते. या शाळेतील विद्यार्थी ,शिक्षक सर्वांना या झाडावरील पोपटाचा लळा लागला आहे हे विशेष. नित्य पोपटाला पाहणारे अनेक पक्षीप्रेमी या आनंदाच्या झाडाने पहिले आहेत. या पोपटाला लागलेला आनंदाचं झाडाचा लळा किती अविस्मरणीय आहे. हे पक्षी दिवसभर इकडे तिकडे उडतात. भटकतात. पण सकाळी आणि संध्याकाळी दररोज या झाडावर ते विसावतात. या झाडाचा रहिवास , सहवास त्यांच्या संवेदनशील मनावर कायमचा रुजला आहे. त्यांना या झाडाची त्याला वाळवी लागलेली असली तरीही झालेली सवय, लागलेला लळा हे शिकवून जातो की एकदा लळा लागला की लागलाच मग अवस्था कोणतीही ,कधीही झाली तरी तो शेवटपर्यंत टिकतो. या पक्षांनी किती सुंदर सुरेख धडा आज शिकवला. अनेक उन्हाळे ,पावसाळे ,हिवाळे या पाखरांनी त्यांच्या आनंद देणाऱ्या झडासोबत अनुभवले असणार आहेत ते अविस्मरणीय आणि सुरेख आहेत. अनेक झाड या वाळवी लागलेल्या झाडा पेक्षा नक्कीच सुंदर टवटवीत हिरवेगार आहेत. तरीही त्या सौंदर्यापुढे त्यांना त्यांचा लळा वाटू लागला आहे.

पाखरांचे आनंदाचं झाड हे पूर्वी अतिशय बहारदार होते . पण त्यावर आतून अनेक वाळवी ह्या हेतुपूर्वक अनेक कट कारस्थान करून केलेल्या कृतीतून त्यांनी झाडाला वाळवी लागण्यास मजबूर केलं. अनेक वेळा असे वाळवी लागून बदलण्यास वाळण्यास प्रेरित करणारे घटक हे आपल्या आजूबाजूला वावरत असतात ते कधीही दुष्ट कपटी मनाने हल्ला करतात.तो हल्ला आतून कायमचे पोखरून टाकण्यासाठी, आपले अस्तित्व पूर्णतः नष्ट करण्यासाठी केलेला असतो. आपण वाळू लागलो की त्यांच्या कृती सफल झाल्या असे समजावे. वाळवी जरी झाडाला वाळवून टाकत असली तरी त्याने त्याच्या आयुष्यात केलेलं सत्कार्य कधीच नष्ट होऊ शकत नाही. आणि या सत्कर्याची दखल पोपटाला आहे. अनेक संकट या त्यांच्या आनंदाच्या झाडाने स्वतः च्या अंगावर झेलून त्यांचे प्राणपणाने रक्षण केलेलं आहे. पाखरांची झाडा बद्दल असणारी निष्ठा ही महत्त्वाची त्याच्या निःस्वार्थ, निर्मळ, निरहेतुक, परोपकारी कार्याची दखल होय. झाडाकडे असणारे सद्गुण पाखरांनी हेरले आहेत आणि स्वतः च्या अंगी रुजली आहेत.

ते झाडं आता कधीही उन्मळून पडणार आहे कारण ते वाळविणे ते पोखरले आहे. तरी पाखरांना हे झाड कायम स्मरणात राहणार आहे कारण की पाखरांचा आणि झाडाचा सहवास हा जिव्हाळा युक्त होता.

आज ही पोपट आयुष्याचे अनेक मौल्यवान धडे शिकवून गेले आहेत. ज्यांनी आपल्याला आसरा, आधार दिला, आपलं अस्तित्व स्वीकारलं, फुलवल आंजारल, गोंजारल, संकटात रक्षण केलं त्यांना कधीही विसरायचे नाही. असे परोपकारी कार्य करणारे दुर्मिळ व्यक्तिमत्त्व हे आयुष्यभर चिर स्मरणात राहणार आहेत.

वाळवी प्रमाणे पोखरून टाकणारे मानव देखील आपल्या अवतीभोवती अस्तित्वात आहेत. ते घटक निष्पाप, निर्मळ, असलेल्या व्यक्तीला त्याच्या अस्तित्वाला आतून पोखरण्याचे कट रचतात

सौ.जयश्री अर्जुन मुंडे
अंबाजोगाई

वेळीच त्यांना ओळखून त्यांच्यापासून चार हात लांब राहणे कधीही चांगले. दोष नसताना देखील ते त्यांच्या कपटी पोखरण्याच्या गुणामुळे कायम सात्विक लोकांना पोखरण्याचे कार्य करतात.

कधी कधी आपण त्यांच्या आधे मध्ये कशात नसतो पण तरीही त्यांच्या कोत्या मनातील बुरसटलेल्या विचारांमुळे ते अनेक गोष्टीत आपल्याला गुंतवू शकतात. बदनाम करू शकतात. पण मुळात वाळवी दुष्ट असल्यामुळे तिला अस्तित्व मुळातच नाही . तिच्यात कोणताच गुण नसल्यामुळे तिला कोणी लक्षात ठेवणार नाही हेही तितकंच ठाम आहे.

पाखरांनी निष्ठा, कृतज्ञता, परोपकार वृत्ती, जाणिवांच्या ज्योती मनात उजळवल्या आहेत.

आज अनेक गोष्टी त्यातील मर्म मला पाखरांनी शिकवला.

वाळवी लागलेलं झाड पाखरांच्या मनात कोरल गेलेलं आहे . धन्यवाद या झाडाचे आणि त्या पाखरांचे त्यांच्या मूळ मला आयुष्याचे सर्वात महत्वाचे हेतू समजले .

लिंबाच्या झाडावरती
भरे पोपटांची शाळा
बालकांना लागला
पोपटाचाच की लळा
पाखरांचा किलबिलाट
होई झाडांच्या वरती
बालकांची कुजबुज
अंगणातच घडती
आनंदाचं झाड
शाळेतलं किडलेल
आनंदाचं झाड
शाळेतच पोखरलेल
शाळेतच जिरलेल
शाळेतच विरलेल
वाळवी लागलेलं
जीर्ण जीर्ण झालेलं
इतरांसाठी झिजलेल
आयुष्यातून उठवलेलं
उध्वस्त झालेलं
वाळविणे खाल्लेलं
एक झाड असेही
अबोल शांत मिटलेल
कायमच मनात
कटाने विटलेल
सत्कर्मांच्या पाऊलखुणा
तशाच हताश उमटवलेल
तसच हसत दबा धरलेलं
आतून पूर्ण पोखरलेल
पाखरांच्या मनातलं
पाहून त्यांना लाजलेल
वाळविणे ते पोखरलेल
उन्मळून पडलेलं

## मिशरूड न फुटलेल्या वयात

ज्योतिर्मय साहित्य

हॅन्डसम दिसणार्या देवानंदचा गाईड चित्रपट पहाण्यात आला. अभिनयाबाबत फारसं न कळणाऱ्या वयात देवानंदच्या कोंबडा स्टाइल भांगाचे त्या काळात सगळेच आशिक होते.


चित्रपटाच्या एका दृश्यात नटी वहीदा भाजका भुट्टा घेऊन देण्याचा देवानंदला आग्रह करते तेव्हा मला त्या वयात आश्चर्य वाटले होते.



गंमत जंमत

पण आता या भुट्याची मजा व रिमझिम बरसातीत बरं गम्मत आणून भाजून टपरीवरील कळकट तळलेले भजे जास्त तसेच रस्त्याने असलेल्या खुरटी वयात भाजक्या महिमा ते ही या अहा! अशी की घरी खाण्यापेक्षा मळकट कढईत खमंग लागतात जातांना कडेला दाढी वाढलेला आणि कळकट कपडे घातलेला मामा जेव्हा धगधगत्या निखार्यात भाजतांना पहातो तेव्हा बिन डोर खिचा आता हूं अशी आपली अवस्था होते. या मौसम मध्ये तर काहीसा अधिकच रोमांटिक फिल येतो. पाच रूपयांना मिळणारा कच्चा कणीस जेव्हा पंधरा वीस रूपयांना विकतांना मामाच्या चेहर्यावरील खुशी बघुन लज्जतीसोबत आपलाही आनंद द्विगुणित होतो.

**परमार बीके**

# एक अभिजात वैभवसंपन्न चित्रपट- 'संगीत मानापमान'

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

नमस्कार मैत्रांनो,

मंडळी, नाचऱ्या मोरांच्या मनोहर कशिद्याने नटलेल्या हिरव्याकंच अस्सल रेशमी पैठणीचे जर एखाद्या कल्पनाशील ड्रेस डिझायनरने जर कलात्मक आधुनिक गाउनसारख्या वेशामध्ये असे कांही परिवर्तन केले की तिचे जातिवंत ऐश्वर्य आणि खानदानी आब याला किंचितही धक्का लागणार नाही, तर काय होईल? याचे अत्युत्तम उदाहरण म्हणजे कृष्णाजी प्रभाकर उर्फ काकासाहेब खाडिलकर यांच्या प्रभावशाली लेखणीतून साकार झालेल्या संगीत मानापमान या या अलौकिक नाट्यकृतीचेच नाव धारण करीत १० जानेवारी २०२५ ला सुबोध भावे दिग्दर्शित चित्रपट प्रदर्शित झाला. नाटकाची काल्पनिक कथा समाजातील आर्थिक विषमतेवर आधारित होती.

मंडळी, केवळ नामधर्मसाम्यामुळे या सिनेमाची तुलना आपण त्या नाटकाशी करायलाच नको. वेगळे माध्यम, आताचा काळ, तंत्रज्ञानाची प्रगती, अभिनयाकडे बघण्याचा दृष्टिकोन आणि मुख्यत्वेकरून आजचे प्रेक्षक तसेच त्यांच्या अपेक्षा, हिंदी आणि दक्षिण भारतीय चित्रपट यांच्याशी असलेली तीव्र स्पर्धा, मल्टिप्लेक्सचा जमाना, या



सर्व बाबींच्या मुळाशी जाऊन हा सिनेमा नवीन नजरेने बघावा. गोष्टीची नवलाई नाही! पारंपरिक त्रिकोण, नायक आणि सहनायक अनुक्रमे गरीब अन श्रीमंत. त्यांचा जीव जडतो एकाच नायिकेवर. अनेक वळण वाटा चालल्यावर नायक नायिकेचे मीलन! उत्कृष्ट कथानक लेखन श्रेय प्राजक्त देशमुख, शिरीष गोपाळ देशपांडे आणि उर्जा देशपांडे यांचे!

विजयालक्ष्मी राणीसरकारांचा (निवेदिता सराफ) रुबाबदार वावर, धैर्यधराची आई चिमणाबाई (नीना कुलकर्णी) हिचा सहजसुंदर अभिनय, मुख्य सेनापती काकासाहेब (शैलेश दातार) यांचे धीरोदात्त व्यक्तिमत्व, महासंग्रामपूरचे साम्राज्य निर्माण करण्याचे दुस्साहसी स्वप्न बघणारा खुशालपूरचा नरेश धीरेन हा उपेंद्र लिमये यांनी साकारलेला पाताळयंत्री खलनायक, अशी कैक पात्रे आठवणीत राहतात. आता वळते धैर्यधराकडे (सुबोध भावे)! नैसर्गिक सहजसुंदर आणि धीरगंभीर अभिनय आणि संगीताची जाण ही सुबोधची बलशाली बाजू धैर्यधराच्या व्यक्तिरेखेत तंतोतंत सामावली आहे. यात तलवारबाजीसारख्या युद्धकलेला आणि त्याच्या वाट्याला आलेल्या पदन्यासाला देखील त्याने आपल्या मेहनतीच्या बळावर आपलेसे केले आहे. नायकाच्या भूमिकेचं वय त्याच्या बाजूने नाही, हे मान्य केले तरी त्यावर जास्त लक्ष कां बरे केंद्रित करायचे? चंद्रविलासच्या धूर्त, कावेबाज, दुतोंडी अन भामिनीवर लट्टू असणाऱ्या

**चित्रपट समीक्षा**

खलनायकाची भूमिका सुमीत राघवनने समर्थपणे पेलली आहे. त्याच्या वाट्याला आलेली गाणी देखील उत्तम!

आता अभिनयाच्या पंचपक्वान्नांच्या थाळीतला शेवटचा गोडाचा घास मैत्रांनो! 'भामिनी' या व्यक्तिरेखेच्या असंख्य नाटकीय प्रतिमा पुसून टाकत नव्या कोऱ्या कॅनव्हासवर नव्या दमाची नाजूक साजूक लावण्यवती भामिनी साकारणाऱ्या वैदेही परशुरामीची प्रशंसा करायला शब्द अपुरे पडावेत इतक्या अभिनयाच्या सुरेख छटा तिने दर्शवल्या आहेत. पारंपरिक अंगभर नऊवार आणि दागिने यांनी सजलेले तिचे जातिवंत मराठमोळे सौंदर्य



बघतांना खरेच नजरेचे पारणे फिटते. वनमालेच्या भूमिकेतील तिचे साधे सोज्वळ रूप तितकेच लोभसवाणे! शरीर प्रदर्शन न करता नायिका लावण्यखणी दिसू शकते, हे या चित्रपटातील वैदेहीच्या प्रत्येक रूपात (अगदी रणरागिणीच्या देखील) जाणवते.

हा चित्रपट अभिजात संगीताने नटलेला आहे. नाटकातील मोजक्या (मूळ ६६ गाण्यांतून) गाण्यांना नव्याकोऱ्या चाली देणारे अनवट संगीतकार अर्थातच शंकर एहसान लॉय यांचे जितके कौतुक करावे तेवढे कमी! शूरा मी वंदिले, रवी मी, नाही मी बोलत, सारखी अजरामर गाणी तितक्याच कौशल्याने चित्रपटात चपखल बसली आहेत. आजचे १८ लोकप्रिय गायक गायिका यांची कर्णमधुर १४ गाणी ऐकणे आणि बघणे म्हणजे स्वर्गीय अनुभव! इतर गाणी देखील तितकीच श्रवणीय आहेत. नाटकात नसलेली नांदी (वंदन हो!) अमृता खानविलकरच्या विलोभनीय शास्त्रीय नृत्यकलेने बघताक्षणी आपल्या काळजाला हात घालते. शेवटचे गाणे ऋतू वसंत तर या सिनेमाच्या संगीताचा चरमोत्कर्षच समजावा. या श्रवणीय आणि प्रेक्षणीय गाण्यावरील समूह नृत्य लाजवाब!

राजवाडे, स्नानगृह, नक्षीकाम, कोरीव मूर्ती, निसर्गरम्य घनदाट वनराजी, प्राचीन मंदिरातील सायंकालीन दीप प्रज्वलन, अन काय काय, भव्य दिव्य सेट्स, सर्वच कमालीचे कलात्मक! कथेतील युद्धाच्या पार्श्वभूमीवर वळणावर नायक नायिकेचे एकमेकांवरचे प्रेम व्यक्त होते, तो प्रसंग तर अतिशय हृद्य! एकमेकांवरील प्रेमाची हृदयस्पर्शी जाणीव अशाच तलवारबाजीच्या सळसळत्या द्वंद्वाच्या साक्षीने होते, ही नवतीची नवलाई मला खूपच भावली. नेत्रदीपक सिनेमॅटोग्राफी तर मोठ्या पडद्यावरच बघायला हवी.

एकंदरीतच 'संगीत मानापमान' हा फक्त सांगीतिक चित्रपट नव्हे तर, एक अविस्मरणीय अद्भुत कलाविष्कार आहे असे मला वाटते. एक प्रसिद्ध नाटक ते प्रयोगशील सिनेमा असा धैर्याने आणि धडाडीने मळलेल्या वाटा सोडून अनामिक वाटेने प्रवास करीत दिमाखात अंतिम लक्ष्य साध्य करणारे या चित्रपटाचे निर्माते ज्योती देशपांडे आणि सुनील फडतरे तसेच दिग्दर्शक-अभिनेता धैर्यधर सुबोध भावे यांना माझा मानाचा मुजरा!



डॉ.मीना श्रीवास्तव

# मायाळू आजी...!

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

शाळेच्या वाटेवर एक वडाचे मोठे झाड होते. त्या झाडाच्या बुंध्याला एक पार बांधलेला होता. दहा वाजले की पेरूवाली आजी तिथे यायची. टोपली खाली टेकायची. डोक्यावरची चुंबळ काढून तीच अंथरायची नि त्यावर बसायची.

दिलीप आणि सलीम म्हणजे त्या शाळेतली दोन खोडकर मुले होती. फसवाफसवी, खोटेनाटे, मारामारी, दादागिरी हाच त्यांचा उदयोगधंदा होता. त्यांनी अभ्यास कधीच केला नाही. नाव शाळेचे नि काम खोडयांचे असा त्यांचा उदयोग होता. सर्व वर्गावर त्यांचा वचक होता. पेरूवाली आजीचा दिलीप व सलीम या जोडीवर जास्त विश्वास होता. आजी दुसऱ्या कोणत्याही मुला- मुलींना पेरू उधारीवर देत नव्हती, पण दिलीप व सलीमला मात्र देत होती. डुलत-डुलत दिलीप व सलीमची जोडी आली. हे दोघे आजीचे कारकून होते. आजीला लिहीता-वाचता येत नव्हते. आजी त्यांना प्रेमाने म्हणायची, " या रे माझ्या लेकरांनो. " आजीने त्यांना आपल्या हातांनी दोन पेरू दिले. आजी त्या दोघांना सुट्टी वगळता रोज उधारीवर पेरू दयायची. आणि आजी पिशवीतून चुरगाळलेला कागदाचा तुकडा काढायची आणि दिलीप व सलीमला त्यांच्या पेरूची उधारी लिहीण्यास सांगायची. ते दोघे आजीसमोर खोटेनाटे काहीतरी लिहायाचे. आणि शाळा भरल्यावर वर्गात जायचे. आजी तो कागद पिशवीत ठेऊन त्यांच्याकडे पाहत राहायची. कारण आजीला एकुलता एक मुलगा होता. तो उच्च शिक्षण घेऊन अमेरिकेत मोठया पदावर नोकरीवर होता. तो तेथून दर महिन्यास आईला महिनाभर पुरतील इतके पैसे पाठवायचा. त्याला पण दोन मुले होती. ती दिलीप आणि सलीमच्या वयातली. रोज अमेरिकेतील मोठया शाळेत जायची. आजीला आपल्या नातवांची खूप आठवण यायची. त्या आठवणी खातर पेरूवाली आजी शाळेतल्या मुला-मुलींना पाहायची, आणि डोळे पुसायची. म्हणून आजी दिलीप व सलीमला आपल्या नातवांप्रमाणे जीव लावायची. तसे पाहता आजीला पेरू विकण्याची काहीच गरज नव्हती. पण नातवांच्या आठवणीत शाळेत शिकणाऱ्या मुला-मुलींना मन भरून पाहता यावे म्हणून आजी पेरू विकायची.

त्या दिवशी मधली सुटी झाली. शाळा सुटली तरी झाडाच्या पारावर आजी दिसली नाही. आजीला ताप आला होता. म्हणून आजी घरीच पडून होती. तिच्याकडे तीच्या मुलाने पाठविलेले पैसे एका गाडग्यात आजीने जपून ठेवले होते. परंतु आजीला जागचे हालता येत नव्हते, इतकी कमजोरी आलेली होती. आजी दोन दिवस एकटीच घरात अन्नपाण्याशिवाय पडून होती.

दिलीप आणि सलीमला आजीची फार आठवण येत होती. कारण दोन दिवसापासून पारावर शांतता होती. पण पेरूवाली आजी मात्र काही दिसत नव्हती. दिलीप व सलीमला पश्चाताप झाला की, आपण म्हाताऱ्या आजीला फसविले. हे आपण काही चांगले केले नाही. असे त्यांना मनोमनी वाटायला लागले. तिसऱ्या दिवशी ते दोघे लवकर शाळेतून बाहेर पडले. आजीच्या घरची वाट लांबची होती. घराच्या आसपास ऊसाचे मळे होते. नंतर आजीचे घर. त्यांनी आजीला दाराबाहेरून आवाज दिला. आजीचे घरचे दार उघडेच होते. आतुन आवाज आला की, " या रे माझ्या लेकरांनो, आत या." आजीचा आवाज खोल गेलेला होता. कारण आजीला खूप ताप आलेला होता,आणि आजीचे हातपाय हालचाल करीत नव्हते. दिलीप व सलीमने आजीला चहा करून पाजला. मग आजीला थोडी तरतरी आली. आजीला डॉक्टरांकडे नेणे भाग होते. पण तिला दवाखान्यात नेणे खूप अवघड होते. आजीने त्या दोघांना सांगितले की, " माझ्याकडे पैसे आहे, बघा त्या गाडग्यात. त्या दोघांनी गाडग्यात पाहिले तर त्यामध्ये आर्धा गाडगा चिल्लरने भरलेला होता. वरती पाचशे-पाचशे रुपयांचे चार बंडल होती.पैसे पाहून इथेही त्या दोघांच्या मनात पैसे चोरण्याचे आले होते. परंतु मनातून त्यांना वाटेनासे झाले. त्यांना सारखी-सारखी आजीच्या जुन्या आठवणी येत होत्या. त्यांनी त्यातून एकही पैसा घेतला नाही. गावातल्या जोशी डॉक्टरला त्यांनी कारमध्ये घेऊन आणले. डॉक्टरांनी आजीला तपासले व आपल्या दवाखान्यात नेले. आजीच्या आजाराची बातमी वाऱ्यासारखी शाळेत पसरली. शाळेतील मुले-मुली आपापल्या वेळेनुसार आजीला पाहण्यासाठी दवाखान्यात जात. दोनचार दिवसानंतर आजी बरी झाली. व तीला दवाखान्यातून सुटी मिळाली. दिलीप व सलीमने आजीच्या गाडग्यातल्या पैशाला हात न लावता, आपापल्या आई-वडिलांकडून पैसे आणून डॉक्टराचे बील दिले. त्या दोघांनी आजीला तिच्या घरी पोहचविले. आजीचे घर शाळेच्या मुला-मुलीने पार भरून गेले होते.

आजीने सर्व मुला-मुलींना खाली बसविले. आणि सांगितले, " मला एक मुलगा आहे. तो उच्च शिक्षण घेऊन दूर देशी अमेरिकेत मोठ्या पदावर नोकरीला आहे. त्यालाही दोन मुले आहे. ती आपल्या दिलीप आणि सलीमसारखीच दिसतात. मला एकटीला घरी करमत नाही म्हणून, आणि मला नातवांची फार आठवण येते म्हणून मी पेरू विकण्याच्या बहाण्याने शाळेत येऊन तुमच्यात माझ्या नातवांना पाहते. आणि तेव्हा मला खूप समाधान वाटते." हे ऐकल्यावर दिलीप व सलीमला रडू आवरेना. सर्व मुले-मुली आजीला धरून रडाया लागली. आजीने ही डोळ्याला पदर लावला.

**अय्युब पठाण लोहगावकर**
पैठण मो. ९७६४३ ५०३७४

***

# "पिंपळपान"

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

कित्येक दिवस निघून गेले, काळाच्या पडद्याआड गढून गेले, तरीही मी विचारांच्या भोवऱ्यात अडकून होतो. जनसामान्यांत राहुनही नेहमी एक उदासीनता मनात दर्पण भावनेने दडलेली होती. मनातील शब्दफुलांचे धागे एकमेकांत गतःकालच्या वल्गना घेऊन गुंतलेले. एक धागा सुटला की अनेक सूतगुंडे पुन्हा गाठी मारुन पुढ्यात बसलेले. आता कोणता गुंता सोडवावा.... खरे काही कळेना.... मनातले हे शब्दकोडे मज उमजेना....? जीवन हे असेच असते. एखाद्या उगमकोड्यासारखे. मृगजळाप्रमाणे कितीही पाठलाग केला तरीही न उमगणारे.

माझा जन्म खेड्यातला पण बालपण मुंबईतच रमले, मुंबईत आमच्या घरामागे एक सुंदरशी बाग होती तिचं नाव मंगलबाग. अतिशय मोहक, सुंदर अशी ती फुलबाग झाडे-झुडपे व फळझाडांनी वसंत ऋतूत बहरलेली असायची. शाळेचा महीनाअखेर किंवा सुट्टीच्या दिवशी आम्ही तेथे खेळायला, बागडायला जायचो. पतंग उडविणे, लुपाछुपी खेळणे किंवा बागेत बसून फुला-फळांचा मनमुराद आस्वाद घ्यायचो. वसंताच्या बहरात बागेतील टुमदार मळा, फुललेली रानफुले जाई, चाफा, मोगरा, गुलाब अशा नानाविध पुष्पफुलांचे सडे मी पहातच रहायचो. चहूकडची ती फळांची आरास पाहून मन अगदी अचंबीत होऊन जायचे. मग फळे चाखत चाखत आम्ही झाडांच्या फांद्यांवर झोके घ्यायचो. मला राहवून राहवून त्या भरगच्च रानातील फुलांचा सुगंध हरविण्याचे भय वाटायचे. पण एकीकडे मन विचलीत व्हायचे, की एवढा सुगंध साठवून ठेवायचा तरी कसा? फुलपाखरांना सांगावे पण ती भुर्रकन एका फुलावरुन दुसरीकडे सुगंध पसरविण्यात दंग झालेली पतंगे काय ऐकणार? भुंग्याला सांगितले तर तो अवेळी आ वासून बसलेला असतो? पक्षी सारे मग्न, आपापल्या घरट्यात किलबील करत असतात. मनाची खंत आता मांडावी तरी कुणासमोर? मग त्यासाठी खटपट काय करावी..? काही कवणं, चारोळ्या अन् कविता! छे...! तेव्हा मला हे सारं सारं काही जमण्यापलिकडेच!

जीवनाचे नवे गीत
एक अजोड गणित..
पुष्प फुलांचा सुगंध
दरवळे वसंतात..!

अशाच काहीशा सुस्पष्ट कल्पना , वल्गना म्हणा किंवा संवेदना कोऱ्या कागदावर उतरवत रहायचो,

कित्येक अशा वेदना
लिहीता लिहीता उमजेना..
मनात दुखःद संवेदना
पुसता कुणास पुसवेना..!

कधी शांता शेळके यांच्या रुपानं त्या बागेत मोगरा फुललेला तर कधी कवीवर्य कुसुमाग्रजांप्रमाणे वैशाखात अंतरंग मनामनात दरवळलेला. त्यांच्या रुपकतेचा पगडा त्या बागेत नितांत ओसंडूनी वाहत असे. अशा एक , दोन कित्येक चारोळ्या, कवीता तिथल्या सहवासस्पर्षाने माझ्या लेखणीत उदयास आल्या, कधी पुष्पक तर कधी पुष्पवनिता, सावल्यांच्या छायेत येथे असंख्य पाकळ्या फुलत राहील्या.... कधी रुजावात तर कधी सांजसावल्यांत मावळतीला धुंद गगनात विसावल्या.... काटेरी फुलांनी बोचलेल्या हृदयातल्या जखमा हळहळल्या.... नकळत मन सुन्न झाले आणि रातकीडे कीरकीर करु लागले....

आजही ती बाग तशीच आहे. फक्त तिचे स्वरुप बदललेय. फुलझाडे , फळझाडे तेथे नाहीत. ती जाई-जुई विरुन गेली, मोगऱ्याचा सुगंध चराचरात दरवळून राहीला. लवलेश तेथे उरला तयास नाव दिधले "पिंपळपान". हे पिंपळाचे झाड पंचवीस वर्षाआधी जसे दणकट होते आजही तसेच ते आपली मुळे धरणीत रोवून उभे आहे. त्याचे प्रत्येक पान अन् पान कवडशांतून परागकण वेचत आहेत आपला उभा जन्म घडविण्यास. त्या पानांची जाळी झाल्यावर लहानपणी आम्ही त्याला पुस्तकात जपायचो, त्यावर गणपती, मारुती आणि निसर्गदेखावा अशी रेखीव चित्रे काढून आठवणीतील ते पान एखाद्याला भेटवस्तू म्हणून देत. सणासुदीला सरस्वती, मारुती, गणपती अशी चित्रे पानावर काढून त्याची पुजा अर्चा करायचो. असे हे आठवणीतले पान आणि अशी कित्येक जिर्ण पर्णे आज डोळ्यांसमोर आठवणींच्या हिंदोळ्यांवर तरंगताना दिसतात. आज त्या पिंपळाच्या पारंब्या वृद्ध झाल्या असल्या तरीही त्याच्या प्रत्येक पानाची जाळीदार नक्षी माझ्या जीवनाचा गुंता सोडविते आणि मन माझे बेभान होऊन गाऊ लागते. ****

**प्रदीप बडदे, नवी मुंबई**
**भ्र.९५९४०२७९९५**

# डॉ मीना श्रीवास्तव यांना म.प्र. हिंदी लेखिका संघाचा साहित्य कृती पुरस्कार

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**भोपाळ** – ठाण्याच्या प्रसिद्ध लेखिका डॉ मीना श्रीवास्तव यांच्या 'भारतीय स्वतंत्रता आंदोलन की अनकही कहानियाँ' या हिंदी अनुवादित पुस्तकाला भोपाळ (म.प्र). हिंदी लेखिका संघाद्वारे २०२४ चा साहित्य कृती पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. डॉ श्रीवास्तव यांना हा पुरस्कार संघाच्या ३० वा वार्षिक सत्कार समारंभात २३ फेब्रुवारी २०२५ ला भोपाळ येथे प्रदान करण्यात येईल. श्री हेमंत सामंत यांच्या मराठी वृत्तपत्रीय लेखांवर आधारित या हिंदी अनुवादित पुस्तकात भारतातील आणि परदेशातील अनामिक स्वातंत्र्यसैनिकांवर लेखन केले आहे. याच विषयावर आधारित भारतीय स्वतंत्रता संग्राम के अनदेखे समरांगण हे त्यांचे अनुवादित पुस्तक देखील २०२४ मध्ये प्रकाशित झाले आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथून एमबीबीएस आणि फार्माकॉलॉजी (औषध शास्त्र) या विषयात एम डी असलेल्या डॉ श्रीवास्तव यांनी मॅनेजमेंटचे तीन डिप्लोमा आणि समाजशास्त्र या विषयात एम ए केले आहे. जवळपास ४५ वर्षे फार्माकॉलॉजी विषयात शिक्षण, प्रशासन आणि संशोधन याचा अनुभव असलेल्या डॉ श्रीवास्तव यांची हिंदी आणि इंग्रजीत ६ अनुवादित पुस्तके प्रकाशित झाली आहेत. प्रसिद्ध साहित्यिक श्री विश्वास देशपांडे यांच्या रामायण आणि वाल्मिकी या मराठी पुस्तकांची डॉ श्रीवास्तव यांच्या द्वारे हिंदी आणि इंग्रजीत अनुवादित ४ पुस्तके २०२३ मध्ये प्रकाशित झाली आहेत.

समाजमाध्यमांवर आणि त्यांच्या स्वतःच्या ब्लॉगवर त्या विविध विषयांवर डॉ श्रीवास्तव मराठी, हिंदी आणि इंग्रजीत विपुल लेखन करीत असतात. त्यांनी समाजमाध्यमांद्वारे आयोजित अनेक स्पर्धांमध्ये पुरस्कार देखील प्राप्त केले आहेत साप्ताहिक जनमंगल (ई-मासिक) यात त्यांनी लिहिलेली मुग़ल -ए-आज़म- कल आज और कल ही २३ भागांची मालिका नुकतीच संपन्न झाली. ज्योतिर्मय दैनिकात औषधे आणि इतर वैद्यकीय विषयांवर आधारित त्यांची दवा-खाना ही प्रबोधनपार मालिका प्रकाशित होणार आहे.

डॉ श्रीवास्तव यांना जामनेरचे वसुनंदिनी फाउंडेशन, सांगलीचे ईगल फाउंडेशन, पुण्याचे साप्ताहिक जनमंगल, पुणे मराठी ग्रंथालय आणि इंदोरची हिंदी डॉट कॉम ही वेबसाईट, या प्रस्थापित संस्थांकडून विविध मानांकित पुरस्कार प्राप्त झाले आहेत. हिंदी लेखिका संघाच्या या मानांकित पुरस्काराबद्दल डॉ श्रीवास्तव यांचे अभिनंदन! इच्छुकांनी पुस्तक खरेदीसाठी डॉ श्रीवास्तव यांच्याशी ९९२०१६७२११ या व्हाट्स ऍप नंबरवर संपर्क साधावा.

# मैत्री कट्टा कवीमनाचा साहित्य समूहाचे तिसरे कवीसंमेलन

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

छत्रपती संभाजीनगर – मैत्री कट्टा कवीमनाचा साहित्य समूहाचे तिसरे साहित्य संमेलन दि. ०९/०२/२०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे घेण्यात येणार आहे. या संमेलनात जवळपास ६० कवी/कवयित्रींचा सहभाग राहणार आहे. या संमेलनात सिध्दार्थ दाभाडे- अमरावती, स्नेहल अभ्यंकर- अकोट, नरेंद्र गुळघाने- वर्धा, सौ. सोनाली बिन्नर- नांदगाव, सिंधुताई दहिफळे- हिंगोली, निवृत्ती महाराज कानवडे, संजय धांडे- अमरावती व विजय जितकर यांना राज्यस्तरीय विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. पहिल्या सत्रात परिसंवाद- शिवा प्रधान व कथन- डी. आर. बांगर तसेच दुसऱ्या सत्रात निमंत्रित कवींचे कवीसंमेलन होणार आहे. या कार्यक्रमाला साहित्यसंमेलन अध्यक्ष सुचिता पाटील- साहित्यिका, व्याख्याती, कवी संमेलन अध्यक्ष गजानन उफाडे पुणे- कवी, लेखक व शिवव्याख्याते, उद्घाटक अनिल साखरे- केंद्रप्रमुख छ. संभाजीनगर, विशेष अतिथी शिवा प्रधान अमरावती- ज्येष्ठ साहित्यिक, प्रकाश पाठक छ. संभाजीनगर- ज्येष्ठ साहित्यिक, बद्रीनाथ भालगुडे सिल्लोड- सुप्रसिद्ध साहित्यिक व समाजसेवक, उपस्थित राहणार आहेत. या साहित्यसंमेलनाचे आयोजन सौ. अल्का साखरे - धोंडणे व गजानन उफाडे यांनी केलेलं आहे. या संमेलनात जास्तीत जास्त संख्येने कवी/कवयित्रींनी सहभागी व्हावे असे आवाहन मैत्री कट्टा समूहाच्या संस्थापिका अल्का साखरे- धोंडणे यांनी केलेलं आहे.




हे जनरल संपादक व प्रकाशक श्री.संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559